cmyk

## संपादकीय

### उदंड जाहली आंदोलने!

कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी येथील मठातील महादेवी या हत्तीणीच्या हस्तांतरणावरून जो वाद निर्माण झाला होता त्यावरून आंदोलन झाले; पण या आंदोलनाचा सकारात्मक परिणाम म्हणून महादेवी हत्तीणीचे हस्तांतरण रद्द करण्यासाठी हालचाली सुरु आहे ही महत्त्वाची गोष्ट ठरली. दुसरीकडे मुंबईमध्ये दादरसारख्या महत्त्वाच्या उपनगरामधील कबूतरखान्याचा विषय आता चर्चेला आला असून त्यावरूनही आंदोलनाची तीव्रता वाढत आहे. महादेवी हत्तीणीच्या विषयावर आंदोलनामध्ये दुसरी कोणती भूमिका कोणाचीच नव्हती त्यामुळे सर्वजण एकाच बाजूला असल्यास हे आंदोलन यशस्वी झाले.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१०६ | रविवार, दि.१० ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### आज वैद्यानाथ बॅकेसाठी मतदान

परळी : वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँक संचालक मंडळ निवडणुकीत उद्या रविवारी मतदान होणार आहे. सभासद क्रमांक १ ते ७७४७ हे वैद्यनाथ महाविद्यालयात तर ७७४७ ते ११७९४ यांचे मतदान हे कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात मतदान होणार आहे. मतदाराची ओळख पटविण्यासाठी विविध कागदपत्रे ग्राह्य धरली जाणार असून सर्व मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन करण्यात आले आहे.वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँक संचालक मंडळासाठीरविवार दि. १० ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. सभासद क्रमांक १ ते ७७४७ यांचे मतदान वैद्यनाथ महाविद्यालयात १९ मतदान केंद्रावर तर ७७४७ ते ११७९४ यांचे मतदान हे कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात १० मतदान केंद्रावर मतदान होणार असून मतदारांनी काळजीने मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# उद्यापासून अतिमुसळधार पाऊस

## ११ राज्यांना हायअलर्ट, महाराष्ट्रातही दमदार बरसणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**यंदा पावसाळ्याच्या सुरुवातीच्या दोन महिन्यात कमी पाऊस झाल्याने पाणी साठ्यात वाढ झालेली नाही. तसेच गेल्या काही दिवसांपासून देशातील अनेक भागांमध्ये मान्सूनची गती मंदावल्याचे पाहायला मिळत आहे. पावसाचा जोर ओसरला आहे, मात्र पुढील आठवड्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्रातही येत्या आठवडाभरात जोरदार पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज आहे.**

कायमेटच्या अंदाजानुसार भारताच्या उत्तर, पश्चिम, मध्य आणि काही ठिकाणी दक्षिण भागामध्ये मान्सून कमजोर झाला आहे. मात्र वातावरणाची ही सामान्य स्थिती आहे, त्यामुळे चिंता करण्याचे काही कारण नाही. मात्र ही स्थिती जर लांबली तर चिंता वाढू शकते, परंतु सध्या तरी तसे चित्र दिसत नाही.

पुढील आठवड्यात बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे. १२ ऑगस्टला कमी दाबाचा पट्टा निर्माण होऊ शकतो,

पान २ वर

### महाराष्ट्रात कसा असेल पाऊस?

बंगालच्या उपसागरात निर्माण होणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पुढील आठवड्यात राज्यात देखील पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. कोकणात अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे. तर इतरही भागांमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे, यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो, सध्या राज्यात पावसाचा जोर थोडा मंदावला आहे, मात्र पुढील आठवड्यात जोरदार पावसाची शक्यता आहे.



## थोडक्यात...

### नवनीत राणा यांना धमकावणारा अटकेत

अमरावती–माजी खासदार नवनीत राणा यांना व्हिडिओद्वारे शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणात अमरावती शहर क्राईम ब्रांचच्या पथकाने मुख्य आरोपी इसा नामक व्यक्तीला छत्तीसगड मधून अटक केली. नवनीत राणा यांच्या हत्येचा कट रचला गेला त्यासाठी मीटिंगा झाल्या यामध्ये आणखी आठ ते दहा आरोपी आहेत असा आरोप आमदार रवी राणा यांनी केला.

### अनेकांच्या पोटात वेदना–शरद पवार

मुंबई–राज ठाकरे व उध्दव ठाकरे काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष आहे. दोन्ही भावांना एकत्र येऊ द्या, अनेकांच्या पोटात वेदना होत आहे ते होऊ द्या. अनेकांची झोप उडाली ते एकत्र आले, तर आम्हाला आनंद आहे. त्यानंतर आम्ही निर्णय घेऊ, अगोदर त्यांना एकत्र येऊ द्या, असे ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले.

### तरूणाची बंदुकीसोबतची रील व्हायरल

बीड–आणखी एका तरूणाची बंदुकीसोबतची रील व्हायरल झाली आहे. बंदूक हातात घेऊन रील बनवुन सोशल मीडियावर व्हायरल करत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न असून संबंधित तरूण वाल्मीक कराडचा समर्थक असल्याचा दावा केला जातोय. यापूर्वी कैलास फड, गोट्या गित्ते, कुणाल फड अशा अनेकांचे व्हिडिओ व्हायरल झाले होते. आता पोलीसांकडून तात्काळ कारवाई व्हावी अशी मागणी केली जात आहे.

### लवकरच देशात भारत टॅक्सी सेवा सुरू होणार

नवी दिल्ली : देशभरातील ॲप आधारित टॅक्सी सेवेतील ओला, उबर कंपन्यांची मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी आता भारत टॅक्सी येणार आहे. केंद्रीय सहकार विभागाच्या पुढाकाराने देशात प्रथमच सहकारी तत्त्वावर भारत टॅक्सी सुरू करण्याची तयारी सुरू झाली आहे. त्यासाठी बहुराज्य सहकारी टॅक्सी सेवा संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र, गुजरात, दिल्ली आणि उत्तर प्रदेशात ही सेवा सुरू केली जाणार असल्याची माहिती राष्ट्रीय सहकार विकास निगममधील सूत्रांनी दिली आहे.

### इंडिया आघाडीचा ११ ऑगस्टला मोर्चा

नवी दिल्ल–इंडिया आघाडीचा ११ ऑगस्टला केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर धडक मोर्चा निघणार आहे. राहुल गांधी यांनी केलेल्या मतचोरीच्या आरोपानंतर वातावरण चांगलच तापले असून घोटाळ्याविरुद्ध संसद आणि बाहेरही लढा उभारण्याचा निर्णय सर्वच विरोधी पक्षांनी घेतला आहे.

### लाडक्या बहिणींना राज्य सरकारची ओवाळणी

मुंबई : राज्यातील लाडक्या बहिणींना सरकारकडून रक्षाबंधनची ओवाळणी देण्यात आली आहे. शुक्रवारपासून लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात झाली असून विशेष म्हणजे गतवर्षी रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने २ महिन्यांचा हफ्ता एकत्रितपणे दिल्याने महिलांना थेट ३ हजार रुपये मिळाले होते. मात्र, यंदा एकच हफ्ता मिळणार आहे.

### देशभरात टोमॅटोची टंचाई

पुणे : टोमॅटोच्या दरांनी उसळी घेतली असून कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणमधून होणारी टोमॅटोची आवक घटली आहे. त्यामुळे देशभरात टोमॅटोची टंचाई निर्माण झाली आहे. मुंबई, दिल्ली, चेन्नई या प्रमुख महानगरांत किरकोळ बाजारात टोमॅटोचे दर ७० ते १०० रुपयांवर पोहोचले आहेत. राजधानी दिल्लीत केंद्र सरकारने हस्तक्षेप करत स्वस्त दरात टोमॅटोची विक्री सुरू केली आहे. मात्र मुंबईसह महाराष्ट्रातील शहरांतील ग्राहकांना टोमॅटोचे दर परवडेनासे झाले आहे.

# चार जिल्हाधिकाऱ्यांच्या संयुक्त बैठकीनंतर नव्या रेल्वे मार्गाचा डीपीआर होणार तयार

**बीड । सुभाष चौरे**

**अहिल्यानगर बीड परळी रेल्वे मार्गाला आता गती आली आहे काही दिवसात बीड ते अहिल्यानगर रेल्वे सुरू होईल मात्र आता त्यातच धाराशिव बीड छत्रपती संभाजीनगर या नव्या रेल्वे मार्गाचा हवाई आणि जमिनीवरील सर्वे करण्याचे कंत्राट हैदराबाद येथील कंपनीला देण्यात आले आहेत प्रामुख्याने धाराशिव बीड जालना आणि छत्रपती संभाजी नगर या तिन्ही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक झाल्यानंतरच या मार्गाचा डीपीआर तयार केला जाणार आहे आणि तो महाराष्ट्र शासनाने रेल्वे बोर्डाकडे पाठवला जाणार आहे त्यानंतर जमीन अधिग्रहणाला सुरुवात केली जाणार आहे.**



बीड जिल्ह्यासाठी महत्त्वाची आणि आनंदाची बाब म्हणजे जर हा नवा मार्ग असेल तर आला तर भेटला मोठे रेल्वेचे जंक्शन होऊ शकते आणि आता तशी अशा देखील निर्माण झाली आहे . धाराशिव-बीड-संभाजीनगर व कन्नड-चाळीसगाव या दोन्ही रेल्वेमार्गाचा हवाई सर्व्हे पंतप्रधान कार्यालयाच्या गतिशक्ती योजनेतून हा मार्ग प्रस्तावित आहे. हे दोन्ही सर्वेक्षण हैदराबाद येथील आर्वी इंजिनिअरिंग कन्सल्टन्सीने पूर्ण केला आहेत आता प्रतीक्षा धाराशिव बीड व संभाजीनगर च्या जिल्हाधिकाऱ्यांची एकत्रित बैठकीची या बैठकीनंतर डीपीआर बनवण्याच्या कामाला वेग येईल, आणि त्यानंतर डीपीआर मान्यतेसाठी

पान २ वर

## वक्फ बोर्डाच्या अतिक्रमणित जमिनींवर फिरणार 'बुलडोझर'

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनींवर अतिक्रमण केलेल्यांना वक्फ अधिनियमानुसार रीतसर भाडेपट्टा करून देण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, जे अतिक्रमणधारक वक्फ बोर्डाचे भाडेकरू होणार नाहीत, त्यांच्यावर स्थानिक प्रशासनाच्या माध्यमातून 'बुलडोझर' कारवाई करण्यात येईल असा इशारा राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी दिला.

छत्रपती संभाजीनगरमध्ये पालिकेसोबत वक्फ बोर्डातर्फे अतिक्रमण हटाव मोहीम राबवली जात आहे. ही योजना संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. दक्षिण मुंबईत २०० पेक्षा जास्त मालमत्ता वक्फच्या मालकीच्या असून त्यावर इमारती उभारल्या. ज्यांनी अनधिकृत पद्धतीने ना-हरकत प्रमाणपत्र मिळवले, त्यांची चौकशी सुरू आहे. त्याचा अहवाल आल्यानंतर अशा अनधिकृत नाहरकत प्रमाणपत्र

पान २ वर

## आयोगाने ३३४ राजकीय पक्षांना दाखवला घरचा रस्ता

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

केंद्रीय निवडणूक आयोगाने ३३४ राजकीय पक्षांना देशातील नोंदणीकृत पक्षांच्या यादीतून काढून टाकण्याची मोठी कारवाई शनिवारी केली. आयोगाच्या या निर्णयानंतर आता फक्त ६ राष्ट्रीय आणि ६७ प्रादेशिक आणि २,५२० नोंदणीकृत मान्यता असलेले राजकीय पक्ष देशात आहेत. राष्ट्रीय ६ पक्षांमध्ये भाजप आणि काँग्रेस व्यतिरिक्त आम आदमी पक्ष, बसप, माकप आणि एनपीपी यांचा समावेश आहे. आयोगाच्या यादीनुसार देशात समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल यांसारखे ६७ पक्ष प्रादेशिक पक्ष म्हणून नोंदणीकृत आहेत.

आयोगाने म्हटले आहे की, यादीतून वगळलेले राजकीय पक्ष लोकप्रतिनिधी कायदा–१९५१ च्या कलम २९ ब आणि कलम २९ क च्या तरतुदींसह आयकर कायदा–१९६१ आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण आणि वाटप) आदेश–१९६८ च्या संबंधित

पान २ वर








मुंबईः आज राखी पौर्णिमेचे औचित्य साधून राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे तसेच बीडच्या माजी खा. डॉ.प्रितमताई मुंडे यांनी आ. धनंजय मुंडे तसेच रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला.

## आष्टी शहरातील बोगस मतदार प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांना शपथपत्रासाठी मुदतवाढ

**बीड । प्रतिनिधी**

**आष्टी विधानसभा मतदारसंघातील २०२३ च्या प्रारूप यादीमध्ये जवळपास ५५० मतदारांची नावे बनावट कागदपत्रांच्या आधारे नगरपंचायत हद्दीमध्ये समाविष्ट करण्यात आली होती या प्रकरणांमध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठामध्ये दाखल याचिकेत जिल्हाधिकारी यांनी आपला अहवाल सादर केला नाही आता अहवाल सादर करण्यासाठी १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत खंडपीठाने मुदतवाढ दिली आहे.यावेळी अहवाल सादर न केल्यास शासनाचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून निर्णय घेतला जाईल.**



आष्टी नगरपंचायत हद्दीमध्ये जवळपास ५५० बोगस मतदारांची नावे बनावट कागदपत्राच्या आधारे लावली गेली असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांनी केली होती याप्रकरणी तात्कालीन आमदार बाळासाहेब आजबे यांनी देखील तक्रार दाखल केल्यानंतर उपविभागीय अधिकारी पाटोदा यांनी या प्रकरणाची चौकशी करून

पान २ वर

## बीडमध्ये गावठी पिस्टलसह तरुण पकडला

**बीड । प्रतिनिधी**

**कंबरेला एक लोखंडी गावठी बनावटीचे पिस्तुल लावून सार्वजनिक ठिकाणी थांबलेल्या सागर उर्फ सनी प्रकाशमोरे (वय २४) याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. त्याने सदरील पिस्तुल वैभव वराट आणि रितेश वडमारे यांच्याकडून घेतल्याचे सांगितल्याने पोलीसांनी तिघां विरूध्द बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.**



पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी जिल्ह्यात अवैध गावठी कट्टा बाळगणाऱ्या इसमांची माहिती काढून त्यांच्याविरूध्द

पान २ वर

## विधानसभेपूर्वी १६० जागा जिंकून देण्याची ऑफर

### शरद पवारांचा सनसनाटी दावा; राजकीय गोटात खळबळ

**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन व्यक्तींनी आपली भेट घेतली होती आणि १६० जागा जिंकून देण्याची हमी दिल्याचा सनसनाटी दावा शरद पवार यांनी केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी नागपूरमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना एक मोठा गौप्यस्फोट केला. विधानसभा निवडणुकीपुर्वी



पान २ वर

### भाजपची प्रतिक्रिया

भाजप नेते प्रवीण दरेकर म्हणाले की, अत्यंत बालिश आणि हास्यास्पद असे दावे आहेत, असे माझे स्पष्ट मत आहे. पवार साहेबांसारख्या एका ज्येष्ठ नेत्याने अशा प्रकारचे दावे करणे हे खरंच आश्चर्यकारक आहे, असे ते म्हणाले.

## शेती शाश्वत करण्यासाठी प्रयत्न करणार

### कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची ग्वाही टोमॅटोच्या लिलावात किलोला ७० रुपये दर

**पुणे । प्रतिनिधी**

**आजघडीला शेती परवडत नाही, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. वास्तविक पाहता खरच शेती परवडत नसल्याची कबुली देत यापुढे शेती शाश्वत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. जुन्नर बाजार समितीत टोमॅटोचे लिलाव भरणे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.**



कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते शनिवारी टोमॅटोचा लिलाव करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांच्या टोमॅटोला ७० रुपये प्रति किलोचा भाव मिळाला. भरणे पुणे जिल्ह्यातील जुन्नर दौऱ्यावर होते, तेव्हा कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट देऊन भरणेंनी लिलावाचा अनुभव घेतला. केंद्रात आणि राज्यात कृषीमंत्री मामाच आहे. आम्ही दोन्ही मामा कृषीमंत्री म्हणून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन नवीन योजना, तसेच शेतकरी हिताचे निर्णय घेऊ असे भरणे म्हणाले. शेतकऱ्यांना शेती परवडत नाही, हा शेतकऱ्यांचा समज असतो, ही अडचण किंवा चुक नसते असे भरणे म्हणाले. शेती करत असताना अचानक बाजारभाव कमी जास्त होतात.

पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०७ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७.०० क्विंटल | २,३४० | २,७४६ | २,५४३ |
| ज्वारी/हायब्रिड: ५६.०० क्विंटल | २,०५० | २,६०१ | २,३८७ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १३.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ७.०० क्विंटल | २,४०१ | २,७३० | २,६०० |
| मुग: २.५० क्विंटल | ६,४११ | ६,९१० | ६,६६० |
| सोयाबीन: ४.५० क्विंटल | ४,१०० | ४,६११ | ४,३५५ |
| हरभरा: १०.०० क्विंटल | ४,९०० | ६,१०१ | ५,५४६ |



## शरद पवार अन् ओबीसींचा संबंध काय?

### लक्ष्मण हाकेंचा सवाल; मंडल यात्रेवरुन हल्लाबोल

**पुणे । प्रतिनिधी**

**आजकाल कुणीही येते आणि ओबीसींची बाजू घेते. गावगाड्यातील ओबीसी देशोधडीला लागला आहे आणि यांना आता कंठ फुटला आहे अशी टीका लक्ष्मण हाके यांनी शरद पवारांवर केली. तसेच शरद पवार आणि ओबीसींचा संबंध येतो कुठे ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.**

शरद पवारांच्या राष्ट्रवादीने नागपुरातून सुरू केलेल्या मंडल यात्रेवर लक्ष्मण हाके

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# उदंड जाहली आंदोलने!

कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी येथील मठातील महादेवी या हत्तीणीच्या हस्तांतरणावरून जो वाद निर्माण झाला होता त्यावरून आंदोलन झाले; पण या आंदोलनाचा सकारात्मक परिणाम म्हणून महादेवी हत्तीणीचे हस्तांतरण रद्द करण्यासाठी हालचाली सुरू आहे ही महत्त्वाची गोष्ट ठरली. दुसरीकडे मुंबईमध्ये दादरसारख्या महत्त्वाच्या उपनगरामधील कबूतरखान्याचा विषय आता चर्चेला आला असून त्यावरूनही आंदोलनाची तीव्रता वाढत आहे. महादेवी हत्तीणीच्या विषयावर आंदोलनामध्ये दुसरी कोणती भूमिका कोणाचीच नव्हती त्यामुळे सर्वजण एकाच बाजूला असल्यास हे आंदोलन यशस्वी झाले. पण कबूतरखान्याच्या बाबतीत मात्र दोन परस्परविरोधी भूमिका असल्यामुळे हे आंदोलन आणखी काही दिवस चालू राहील अशीच लक्षणे दिसत आहेत.

सर्वसामान्यांना नागरिकांच्या आरोग्याला महत्त्व द्यायचे का कबूतरखान्याला महत्त्व द्यायचे या द्विधा अवस्थेमध्ये महाराष्ट्र सरकार सध्या आहे. या प्रमुख आंदोलनामुळे होणारी चर्चा कमी आहे की काय म्हणून राज्यात ठिकठिकाणी कोठे धरणग्रस्तांचे आंदोलन सुरू आहे, कोठे पेन्शनर संघटनेचे आंदोलन सुरू आहे किंवा काही ठिकाणी शेतकऱ्यांची आंदोलनेही सुरू आहेत. 'खालीद का शिवाजी' या चित्रपटाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी होत असल्याच्या विषयावरूनही आंदोलने सुरू असून या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी होत आहे. तर मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे यांनी २९ ऑगस्ट रोजी मुंबईमध्ये अति भव्य आंदोलन करण्याचाही इशारा दिला आहे. त्या दिवशी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील मराठा बांधवांचा महामोर्चा मुंबईत आणण्याचा मनोदय मनोज जरांगे यांनी व्यक्त केला आहे.

या सामाजिक आंदोलनांचा विषय समोर येत असताना दुसरीकडे संपूर्णपणे राजकीय आंदोलन म्हणून इंडिया आघाडीने आणखीन एका आंदोलनाची घोषणा केली आहे. इंडिया आघाडीतर्फे येत्या सोमवारी मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांचा जो मुद्दा गाजत आहे त्या विषयासाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे. नवी दिल्लीमध्ये संसद भवन ते निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत हा मोर्चा निघणार आहे. एकूणच सध्याचा सिझन नैसर्गिकदृष्ट्या जरी पावसाळी सिझन असला तरी तो राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या मात्र आंदोलनांचा सिझन ठरू पाहात आहे. या सर्व घडामोडींची आणि आंदोलनांची तीव्रता लक्षात घेता सरकारला गांभीर्याने लक्ष द्यावे लागणार आहे.

कारण आधुनिक काळामध्ये सोशल मीडियाच्या अतिरिक्त वापरामुळे अशा प्रकारच्या आंदोलनाबाबतही गैरसमज पसरवले जातात. चुकीच्या बातम्या आणि अफवा सोशल मीडियावर व्हायरल केल्या जातात आणि त्याच्यातून विनाकारणच हिंसेला पाठबळ मिळते. हे लक्षात घेऊनच सरकारला या सर्व आंदोलनांचा मुकाबला करावा लागणार आहे. काही आंदोलने अचानक सुरू होतात, तर काही आंदोलनाबाबत अधिकृत पूर्वसूचना देण्यात आलेली असते. विशेषतः मनोज जरांगे यांनी आपल्या आंदोलनाबाबत पूर्वसूचना दिली आहे. त्यामुळे या विषयाकडे दुर्लक्ष न करता मराठा आरक्षणाचा विषय पुन्हा प्राधान्याने समोर आणण्याचा निर्णय सरकारला घ्यावा लागेल.

काही वेळा विरोधी बाकावर बसणाऱ्या विरोधी पक्षांच्या माध्यमातून किंवा त्यांच्या योजनेतून किंवा त्यांच्या पाठबळामुळे सुद्धा विविध प्रकारची आंदोलने सुरू केली जातात. अशा आंदोलनामध्ये राजकीय चेहरा नसला तरी या सामाजिक आंदोलनांनासुद्धा राजकीय पाठबळामुळे तीव्र स्वरूप प्राप्त होऊ शकते हे महाराष्ट्राने अनेक वेळा पाहिले आहे. ज्या विषयासाठी आंदोलन करण्यात येत आहे तो विषय खरा आणि महत्त्वाचा असेल तर त्वरित निर्णय घेऊन आंदोलनाला पूर्णविराम देणे महत्त्वाचे ठरते. आंदोलन करणे हा लोकशाहीने दिलेला हक्क असला तरी सर्वसामान्य नागरिक हा हक्क बजावत असताना त्याचा गैरफायदा समाजकंटक घेणार नाहीत आणि कायदा व सुव्यवस्था अडचणीत येणार नाही याची काळजी सरकारला या आंदोलनाच्या दिवसांमध्ये जाणीवपूर्वक घ्यावी लागणार आहे. शिवाय इतकी आंदोलने का होत आहेत याबाबतही सरकारने आत्मपरीक्षण करावे.

# बीड शहरातील नगर नाका परिसरात अतिक्रमणावर कारवाई; ३५ अतिक्रमणे हटवली

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील नगर नाका परिसरात रस्त्यावर अनधिकृतपणे उभे असलेले हातगाडे, नाश्ता स्टॉल तसेच वाहने यावर आज सकाळी मोठी अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. या मोहिमेत एकूण ३५ अतिक्रमणे हटवण्यात आली, अशी माहिती प्रशासनाने दिली.**



ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत सर व अप्पर पोलीस अधीक्षक सचिन सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. विशेष म्हणजे, ही कारवाई जिल्हा वाहतूक शाखा, स्थानिक पोलीस प्रशासन, आणि नगरपालिका अतिक्रमण पथक यांच्या संयुक्त पथकाने केली. कारवाई दरम्यान जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी सुभाष, पोलीस उपनिरीक्षक विजय, पोलीस हवालदार सुनील, पोलीस अंमलदार सतोष, विश्वजीत, वसीम, चालक संतोष, तसेच अतिक्रमण पथक प्रमुख मुन्ना गायकवाड, सुजित जाधव, विकी दांगट , शरद खूपसे, राम रोकडे, किरण शिंदे, लखन साबळे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या कारवाईदरम्यान काही ठिकाणी दंडात्मक कारवाई देखील करण्यात आली असून, अनधिकृत व्यापाऱ्यांना इशारा देण्यात आला आहे की, भविष्यात अतिक्रमण आढळल्यास कठोर पावले उचलली जातील. शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अशी कारवाई नियमित करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# पसायदानच्या मुलांचे अनोखे रक्षाबंधन

**बीड । प्रतिनिधी**

**ढेकणमोह येथील पसायदान सेवा प्रकल्पातील वंचित, बेघर मुलांनी शनिवारी एकमेकांना राख्या बांधून अनोखे रक्षाबंधन साजरे केले. यावेळी बहिणींच्या रक्षणाची शपथ भावांनी घेतली.**




ढेकणमोह येथे डोंगराच्या पायथ्यावर असलेल्या पसायदान सेवा प्रकल्पामध्ये आत्महत्या केलेले शेतकऱ्यांची मुले, अनाथ मुले, वंचित आणि बेघर मुलांचा सांभाळ केला जातो. प्रकल्पाचे संचालक गोवर्धन दराडे आणि रंजनाताई दराडे यांनी अशा वंचित मुलांसाठी वाहून घेतले आहे. शनिवारी बहिण-भावासाठी पवित्र मानला जाणारा रक्षाबंधन सण पसायदान प्रकल्पातील मुलांनी एकमेकांना राख्या बांधुन साजरा केला. यावेळी बहिणीची आयुष्यभर रक्षा करण्याची शपथ प्रकल्पातील भावांनी घेतली. हा सण साजरा केल्यानंतर प्रकल्पातील सर्व मुलांना स्नेह भोजन देण्यात आले.

# जास्त झोपेचे 'हे' आहेत तोटे-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**सात ते आठ तासांची झोप आपल्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. चांगली झोप असेल तर तन-मनाला आराम मिळतो. मात्र अतिरिक्त प्रमाणात झोप घेणंही आपल्या आरोग्यासाठी नुकसानदायी आहे. नुकत्याच एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. जर एखादी व्यक्ती दररोज नऊ तासांपेक्षा जास्त झोपत असेल तर त्याचा अचानक किंवा लवकरच मृत्यूचा धोका ३४ टक्क्यांनी वाढू शकतो. हे संशोधन अमेरिका आणि युरोपमधील हेल्थ रिसर्च डेटावर आधारित होते. ज्यात लाखो लोकांच्या झोपेच्या सवयी आणि हेल्थ हिस्ट्रीचं विश्लेषण करण्यात आलं. दररोज नऊ तासांपेक्षा अधिक झोप घेणाऱ्यांमध्ये हृदयविकार, मधुमेह, स्ट्रोक आणि गंभीर आजारांचा धोका असतो. यांचा मृत्यूदर सामान्य लोकांच्या तुलनेत जास्त असतो.**

आरोग्य तज्ज्ञांच्या माहितीनुसार, १८ ते ६० वर्षांच्या व्यक्तीने दररोज ७ ते ८ तासांची झोप घेणं पुरेसं आहे. शरीराची डागडुजी करणं, मेंदूचं आरोग्य आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी हा काळ महत्त्वाच असतो. मात्र, नऊ तासांहून अधिक झोप घेतल्याने आळस आणि अन्य मानसिक आणि शारीरिक त्रास वाढू शकतो. यामुळे पुढील धोके संभवतात : मेटाबॉलिजम म्हणजेच चयापचय क्रिया मंद होते, ज्यातून स्थूलता वाढू शकते. मेंदूचे कार्य कमकुवत होऊ शकते, ज्यामुळे स्मरणशक्तीवर परिणाम होतो. नैराश्य आणि चिंता वाढण्याचाधोका वाढतो. हृदयविकार आणि स्ट्रोकसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. शरीरात थकवा आणि उत्साह कमी असतो. हे टाळण्यासाठी करण्याचे उपाय : दररोज नियमित वेळेत झोपा आणि रात्री उशिरापर्यंत जागरण करू नये. झोपण्यापूर्वी मोबाईल किंवा स्क्रीनचा वापर कमी करा. रात्रीच्या जेवणात कॅफिन आणि जास्त कॅलरीयुक्त अन्न घेऊ नये. दिवसभर थकवा जाणवत असेल तर डॉक्टरांचा सल्ला जरुर घ्यावा.



असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडलिस्ट) न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई (गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# विहिरीत पडलेल्या बिबट्यास जीवदान

## सर्पराज्ञी उपचार सुरू, बिबट्याच्या प्रकृतीत सुधारणा

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

**शिरूर कासार तालुक्यात पैठण पंढरपूर महामार्गा लगत असलेल्या खोल्याचीवाडी येथील पांडुरंग खोले यांच्या विहिरीत सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास बिबट्या पडला. या घटनेची माहिती वन विभाग व सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रास दिली. त्यानंतर चार तासाच्या अथक परिश्रमानंतर बिबट्याला बाहेर काढून तागडगाव येथील सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रात हालविले.**

शेतकरी पांडुरंग खोले हे यांच्या विहिरीत सकाळी दहाच्या वाजण्याच्या सुमारास विहिरीतील सौर ऊर्जा पंप चोरी होण्याचे प्रमाण सुरू झाल्यामुळे आपल्याही विहिरीतील सौर ऊर्जा पंप चोरी गेला आहे का? नाही. हे आपल्या विहिरीतील पंप पाहण्यासाठी गेले असता त्यांना विहिरीच्या सदर मध्ये बिबट्या दिसून



आला . त्यानंतर त्यांनी तात्काळ वन विभाग ,सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रास भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला. त्यानंतर काही वेळातच वन विभाग व सर्पराज्ञीचे संचालक मानद वन्यजीव रक्षक सिद्धार्थ सोनवणे हे घटनास्थळी दाखल झाले. चार तासाच्या अथक परिश्रमानंतर बिबट्यास विहिरीतून सुखरूप बाहेर काढले. बिबट्या विहिरीत पडल्या असल्याच्या बातमीने परिसरातील व गावातील नागरिकांनी घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती ही गर्दी रोखण्यासाठी पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील व तहसीलदार सुरेश घोळवे वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीकांत काळे हे कर्मचाऱ्यासह या ठिकाणी दाखल झाले होते. चार तासाच्या अथक परिश्रमानंतर सर्पराज्ञीचे संचालक मानद वन्यजीव रक्षक सिद्धार्थ सोनवणे यांनी त्या बिबट्यास पोत्याच्या सहाय्याने हाताने पकडून त्यास पिंजऱ्यात जेरबंद केले . बिबट्या अशक्त झाल्यामुळे पुढील उपचारासाठी त्यास सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रात हलवण्यात आले. या ठिकाणी पशुधन विकास अधिकारी डॉ. खाडे व सर्पराज्ञीच्या संचालिका सृष्टी सोनवणे यांनी या बिबट्याची पाहणी करून त्यावर योग्य उपचार केले. सदरील बिबट्याच्या प्रकृती सुधारणा होत असल्याची माहिती सर्पराज्ञीच्या संचालिका सृष्टी सोनवणे यांनी दिली. सदरील बिबट्याला वाचविण्यासाठी विभागीय वन अधिकारी अमोल गरकळ व श्रीकांत काळे यांच्या मार्गदर्शनाखाली मानद वन्यजीव रक्षक सिद्धार्थ सोनवणे,वन विभागाचे कर्मचारी वनपाल अजय देवगडे, वनरक्षक राजेश जोशी, वनरक्षक काकडे यांनी परिश्रम घेतले.

# आ.शशिकांत शिंदे व आ.रोहीत पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा मेळावा



**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नुतन प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे आणि नूतन प्रदेश सरचिटणीस आ. रोहित दादा पवार यांच्याअध्यक्षते खाली व खा.बजरंग बप्पा सोनवणे, आ.संदिप भैय्या क्षिरसागर, जिल्ह्यातील माजी आमदार, प्रदेश पदाधिकारी,जेष्ठ नेते यांच्या प्रमुख उपस्थितीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुक अनुषंगाने १३ ऑगस्ट बुधवार रोजी पदाधिकारी, व कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा आयोजित केला आहे, अशी माहिती बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.**

राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नुतन प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे साहेब व प्रदेश सरचिटणीस आ. रोहीत दादा पवार यांनी मराठवाड्याचा जिल्हा निहाय दौरा सुरू केला आहे. बीड जिल्हा हा देशाचे नेते मा.शरदचंद्र पवार साहेबांना मानणारा जिल्हा. लोकसभा निवडणुकीत सामान्य जनता, पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या बळावर पक्षाला यश मिळाले. तर विधानसभा निवडणुकीत बीडच्या जागेवर यश खेचून आणले. अन्य मतदार संघात अल्पमताने विजय निसटला. आगामी नगरपालिका व जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी पक्ष सर्व ताकदीनिशी रिंगणात उतरणार आहे .निवडणुका जिंकण्यासाठी पक्षाने कामाला सुरुवात केली आहे. या अनुषंगाने १३ ऑगस्ट रोजी दुपारी चार वाजता अंबिका लॉन्स पांगरी रोड बीड येथे हा मेळावा संपन्न होणार आहे. आगामी निवडणुकांच्या संदर्भाने चाचपणी होणार असल्याने स्थानिक स्वराज्य निवडणुका लढवु इच्छित असणाऱ्या कार्यकर्त्यांनी आवर्जून उपस्थित राहावे. मेळाव्याच्या निमित्ताने प्रथमच नूतन प्रदेशाध्यक्ष आ.शशिकात शिंदे व नूतन प्रदेश सचिव ज तथा महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष आ. रोहित दादा पवार बीड जिल्ह्यात येत असून त्यांचे जंगी स्वागत करण्यात येणार आहे. मेळावा यशस्वी करण्यासाठी तालुका प्रमुख, महिला आघाडी, युवक आघाडी, विद्यार्थी आघाडी. सर्व आघाड्यांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

## पान १ वरून...

### उद्यापासून अतिमुसळधार

१३ ऑगस्टला हे क्षेत्र आणखी मजबूत होईल. सध्याची हवामानस्थिती या कमी दाबाच्या पट्ट्याला अनुकूल आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात देशभरात अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे, असे स्कायमेटने म्हटले आहे. तसेच येत्या आठवड्यात बंगालच्या उपसागरात निर्माण होणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, आणि पूर्व उत्तर प्रदेशात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे, तर दुसरीकडे याचा परिणाम म्हणून छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा व गोवामध्ये देखील जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

-----------------

### वक्फ बोर्डाच्या अतिक्रमणित जमिनींवर

घेतलेल्यांविरोधात फौजदारी कारवाई करण्यात येईल असे त्यांनी स्पष्ट केले.

**'जीआयएस'द्वारे आढावा**

राज्यात वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनींची स्थिती जाणून घेण्यासाठी जीआयएस मॅपिंग करून त्याचा आढावा घेण्यात येणार आहे. वक्फच्या माध्यमातून ५० महिला व ५० विद्यार्थ्यांना एक लाख रुपयांचा धनादेश देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी बोर्ड प्रयत्न करणार आहे.

--------

### चार जिल्हाधिकाऱ्यांच्या संयुक्त बैठकीनंतर

सादर करण्यात येईल व डीपीआर मान्यतेनंतर जमीन अधिग्रहण कामात सुरुवात होईल धाराशिव ते छत्रपती संभाजीनगर आणि छत्रपती संभाजीनगर ते काश्मीर, कन्याकुमारी मराठवाड्यातून उत्तरेला काश्मीर ते इंदूर रेल्वेमार्ग असल्याने आणि आता नव्याने इंदूर ते मनमाड या मार्गाला मंजुरी मिळाली. हे कामही सुरू झालेले आहे. त्यामुळे मराठवाड्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर आणि छत्रपती संभाजीनगर-कन्नड-चाळीसगाव या दोन्ही प्रकल्पांमुळे काश्मीर ते कन्याकुमारी असा दक्षिण ते उत्तर भारत जोडला जाणार आहे. छत्रपती संभाजीनगर ते चाळीसगाव हा लोहमार्ग खानदेश, पश्चिम भारताला जोडण्यासाठीचा अतिशय जवळचा मार्ग आहे. या मार्गामुळे तीन मिलिटरी कँप जोडले जाणार आहेत. मनमाड रेल्वेस्थानकाचा भारही कमी होणार आहे. या मार्गावरून माल वाहतूक वाढणार आहे, पर्यटनाला चालना मिळण्यास मदत होणार आहे. याशिवाय रेल्वेचेही उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे. विशेष म्हणजे बीड धाराशिव छत्रपती संभाजीनगर आणि जालना या तिन्ही जिल्हाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक झाल्यानंतर डी पी आर तयार केला जाणार आहे आणि त्यानंतरच या रेल्वे मार्गावरील जमीन अधिग्रहण केली जाणार आहे या कामाला आता केंद्राकडूनच गती देण्यात येत असल्याची माहिती रेल्वेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले प्रामुख्याने धाराशिव बीड छत्रपती संभाजी नगर हा रेल्वे मार्ग पूर्ण झाला तर इकडून अहिल्यानगर बीड परळी हा रेल्वे मार्ग अस्तित्वात आहे त्यामुळे बीडला जंक्शन होण्याची शक्यता नाकारता येत नाही विशेषता बीड हे मध्यबिंदू असल्याने या ठिकाणी अनेक उद्योग येतील बेरोजगारी कमी होईल तेव्हा हा मार्ग देखील होणे गरजेचे आहे.

--------------

### आयोगाने ३३४ राजकीय पक्षांना

तरतुदींनुसार राजकीय पक्षांना मिळणारे कोणतेही लाभ मिळविण्यास पात्र राहणार नाहीत. यावर्षी जूनमध्ये निवडणूक आयोगाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना ३४५ मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षांची पडताळणी प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले होते. या प्रक्रियेअंतर्गत, अधिकाऱ्यांनी या पक्षांची चौकशी केली, त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आणि वैयक्तिक सुनावणीद्वारे त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली. नंतर सबंधित अधिकाऱ्यांच्या अहवालाच्या आधारे ३४५ पैकी ३३४ राजकीय पक्षांना अटींचे पालन न केल्याबद्दल आपल्या यादीतून काढून टाकले आहे.भारतीय निवडणूक आयोगाच्या लोकप्रतिनिधीत्व कायदा-१९५१ च्या कलम २९अ अंतर्गत आयोगाच्या या कारवाईनंतरही देशात मान्यताप्राप्त नसलेल्या २८५४ पक्षांपैकी २,५२० राजकीय पक्ष शिल्लक आहेत.भारतात राजकीय पक्षांच्या नोंदणीबाबतच्या नियमानुसार, एखादा पक्ष सलग ६ वर्षे निवडणूक लढवत नसेल तर त्याचे नाव नोंदणी यादीतून काढून टाकले जाते. कलम २९अ अंतर्गत नोंदणीच्या वेळी, राजकीय पक्षांना त्यांचे नाव, पत्ता, पदाधिकाऱ्यांची यादी इत्यादी माहिती द्यावी लागते आणि त्यात काही बदल झाल्यास, आयोगाला तात्काळ कळवावे लागते. आणि मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षांची नोंदणी केली जाते.

----------

### बीडमध्ये गावठी पिस्टलसह

कारवाईचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले त्यानंतर आज दि.९ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीनुसार खासबाग लेंडी रोडच्या उपविभागीय वन कार्यालयाच्या गेट समोर एक इसम कंबरेला गावठी कट्टा लावून कोणाची तरी वाट पाहत थांबल्याची माहिती मिळाली. पोलीसांनी तात्काळ त्याठिकाणी उभ्या असलेल्या सागर उर्फ सनी प्रकाश मोरे (वय २४ रा.खडीक्रशरच्या बाजूला,जुना धानोरा रोड,जिजाऊ नगर बीड) याला ताब्यात घेतले.यावेळी त्याच्या कंबरेला एक लोखंडी गावठी बनावटीचे ४० हजार रूपये किंमतीचे पस्तुल मिळून आले. पोलीसांनी या पिस्तुल विषयी विचारले असता वैभव संजय वराट (रा.चक्रधरनगर बीड) व रितेश प्रभाकर वडमारे (रा.राजुरीवेस बीड) या दोघांनी दिल्याचे सनी मोरे याने सांगितले. त्यानुसार पोलीसांनी सागर उर्फ सनी मोरे, वैभव संजय वराट आणि रितेश प्रभाकर वडमारे या तिघां विरूध्द बीड शहर पोलीस ठाण्यात कलम ३/२५ आर्म अॅक्टप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरील कामगिरी पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत,अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,स्थागुशाचे पोनि.शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील पोउपनि श्रीराम खटावकर, पो.ह.विकास राठोड, आनंद म्हस्के,राहुल शिंदे, अंकुश वरपे, अंमलदार मनोज परजणे, अशफाक सय्यद, अर्जुन यादव यांनी केली.

--------------

### आष्टी शहरातील बोगस मतदार प्रकरणात

पंचनामा केला होता या चौकशीमध्ये संबंधित मतदार हे दिलेल्या पत्त्यावर आढळून आले नाही खोट्या कागदपत्राच्या आधारे मतदार यादीत हे नावे समाविष्ट करण्यात आल्याचे निष्पन्न झाले होते या प्रकरणी व संबंधित यंत्रणेला दोषी धरून त्यांच्यावर कारवाई करण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठवण्यात यावा अशी शिफारस यावेळी करण्यात आली होती मात्र यात कसलीच कारवाई करण्यात आली नाही त्यामुळे या सर्व दोषीवर कलम ४२० ४६७ ४६८ ४७१ १२० प्रमाणे गुन्हे दाखल करावेत यासाठी राम खाडे अजीम शेख यांनी एडवोकेट नरसिंह लक्ष्मण जाधव यांच्यामार्फत फौजदारी याचिका संभाजीनगर खंडपीठामध्ये दाखल केली होती या प्रकरणांमध्ये खंडपीठाने बीडचे जिल्हाधिकारी यांना आठ मे २०२५ पूर्वी शपथपत्र दाखल करू चौकशी अहवाला प्रमाणे जिल्हाधिकारी बीड हे कारवाई करणार आहेत की नाही याबाबतचा खुलासा शपथपत्रात करण्याचे आदेश दिले होते सत्रेली याचिकेची सुनावणी १२ जून २०२५ रोजी ठेवलेली होती परंतु त्यानंतर वरील प्रकरणात जिल्हाधिकारी बीड यांच्या वतीने कुठलेही शपथपत्र दाखल न झाल्याने ४ ऑगस्ट २०२५ च्या सुनामी मध्ये ऍडव्होकेट नर्सिंग जाधव यांनी उच्च न्यायालयास वरील बाबी निदर्शनास आणून दिली असता न्यायालयाने वरील प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी शपथपत्र दाखल न केल्यास इतर कारवाई व्यतिरिक्त दिनांक १४ ऑगस्ट पर्यंत शपथपत्र दाखल केले नाही तर सदरील प्रकरणात शासनाचे काही म्हणणे नाही असे गृहीत धरून प्रकरणांमध्ये पुढील निर्णय घेण्यात येईल असे निर्देश दिले आहेत सदर याचिकेवर २६ ऑगस्ट २०२५ रोजी सुनावणी घेण्यात येणार आहे याचिका कलकत्ता च्या वतीने एडवोकेट नर्सिंह जाधव हे काम पाहत आहेत.

--------------

### शेती शाश्वत करण्यासाठी

नुकसान होते, काही शेतकऱ्यांना शेतीतून पैसे मिळतात तर काहींना मिळत नाहीत. त्यामुळे शेती शाश्वत नाही यासाठी शेतकऱ्यांनी काय केले पाहिजे. शेती शाश्वत होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे भरणे म्हणाले.

**शेती परवडत नाही हे शेतकऱ्यांचे मत चुकीचे नाही**

शेती परवडत नाही हे शेतकऱ्यांचे मत चुकीचे नाही अशी कबुली दत्तात्रय भरणे यांनी दिली. शेतकऱ्यांच्या भावना रास्त आहेत असे भरणे म्हणाले. बाजार समितीतल्या लिलावाचा अनुभव हा लहान पणापासूनचा आहे. माझ्या हातून टोमॅटोचा लिलाव झाला, शेतकऱ्यांना चांगला भाव मिळावा असे भरणे म्हणाले.

-------------

### विधानसभेपूर्वी १६० जागा

आपल्याला दोन व्यक्ती भेटल्या होत्या, १६० जागा जिंकून देण्याची हमी देत होते, मात्र मी आणि राहूल गांधी यांनी त्याच नकार दिला असल्याचे पवारांनी सांगितल्याने राजकीय गोटात खळबळ माजली आहे.

शरद पवारांच्या शब्दाला राज्यात मोठी किंमत असून राहुल गांधीनंतर आता पवारांनी विधानसभा निवडणुकीतील झोलझालवर भाष्य केले आहे. ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन व्यक्तींनी त्यांची भेट घेतली होती आणि १६० जागा जिंकून देण्याची हमी दिली होती. मात्र, निवडणूक आयोगावर कोणतीही शंका नसल्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याचा निर्णय घेतल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. तसेच, त्या दोघांची भेट राहुल गांधी यांच्यासोबतही घालून देण्यात आली होती. मात्र आम्ही दोघांनीही लोकांमध्ये जाऊन जो निर्णय जनतेचा असेल तो मान्य करण्याचे ठरवले आणि त्या व्यक्तींनी दिलेल्या प्रस्तावाकडे दुर्लक्ष केले, असे देखील शरद पवार यांनी म्हटले. पवारांच्या या विधानानंतर राज्यात मोठी खळबळ माजली असून निवडणुक आयोगाच्या विरोधात वातावरण तापत असल्याचे चित्र आहे.

----------

### शरद पवार अन् ओबीसींचा

यांनी जोरदार टीका केली आहे. शरद पवार मडल आयोगाबाबत अर्धसत्य सांगत आहेत. शरद पवारांना मंडल यात्रा काढण्याचा अधिकार कुणी दिला? असा प्रश्न त्यांनी विचारला. शरद पवार यांना ओबीसी मतांची वाणवा जाणवली म्हणून आज मंडल यात्रा काढली असा आरोपही त्यांनी केला. शरद पवार आणि ओबीसींचा संबंध येतो कुठे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच देवेंद्र फडणवीसांनी ओबीसी समाजाचे पालकत्व घ्यावे, ओबीसींच्या मागण्या मान्य कराव्यात अन्यथा आमची ताकद दाखवून देऊन असेही हाके म्हणाले.

------------

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. १० ऑगस्ट २०२५




## थोडक्यात....



### सुरुडी आश्रमशाळेकडून सैनिकांना राखीची भेट

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथील प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतनाजी मोरे मॅडम यांच्या प्रेरणेने व शाळेचे मुख्याध्यापक श्री सुधाकर राठोड यांच्या मार्गदर्शनाने शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सुरुडी ता आष्टी जि बीड येथील विद्यार्थिनींनी टाकाऊ पासून टिकाऊ व स्वयमनिर्मित राख्या बनवल्या. या राख्या आपल्या भारत मातेच्या संरक्षणासाठी सीमेवर ऊन, वारा, पाऊस यांचा कसलाही विचार न करता कर्तव्यावर दक्ष असणारे सैनिकांना पाठवण्यात आलेल्या आहेत . या उपक्रमासाठी शिक्षक केतन काकडे व संगीता जाधव यांनी परिश्रम घेतले.



### सिंदफणा शाळेत पर्यावरण रक्षणाचा अनोखा रक्षाबंधन सोहळा

माजलगाव । प्रतिनिधी

विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळाच्या सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव येथे रक्षाबंधनाचा सण अतिशय अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी पारंपरिक रक्षाबंधनाला पर्यावरणीय स्पर्श देत वृक्ष रक्षाबंधन या नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे निसर्गाशी आपले नाते दृढ करण्याची परंपरा कायम ठेवली.

या आगळ्यावेगळ्या उपक्रमांतर्गत विद्यार्थी व शिक्षकांनी शालेय परिसरातील विविध प्रकारच्या झाडांना राखी बांधली आणि त्यांच्या संरक्षणाची पवित्र शपथ घेतली. भारतीय संस्कृतीतील भावंडांच्या प्रेमाचे व संरक्षणाचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधन सणाला पर्यावरण रक्षणाचा संदेश जोडून हा उपक्रम अधिक अर्थपूर्ण बनवण्यात आला. विद्यार्थ्यांनी झाडांना आपले हरित बंधू समजून त्यांच्याशी भावनिक नाते जोडले. झाडाला राखी बांधताना त्यांनी त्यांच्या दीर्घायुष्यासाठी मनःपूर्वक प्रार्थना केली आणि त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारली. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. वरुणराज तौर म्हणाले, ''वृक्ष हेच आपले खरे रक्षणकर्ते आहेत. त्यांच्या अस्तित्वामुळेच संपूर्ण मानवजातीचा श्वास चालू राहतो. गेली तीन वर्षे आम्ही हा उपक्रम अत्यंत उत्साहाने राबवत आहोत आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करत आहोत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवाद्वारे निसर्गसंरक्षणाचे महत्त्व कळते.'' शाळेचे प्राचार्य अन्वर शेख यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, ''केंद्र सरकारने सुरू केलेली एक पेड़ माँ के नाम ही संकल्पना खरोखरच प्रेरणादायी आहे. आम्ही आमच्या विद्यार्थ्यांना आवाहन करत आहोत की, येत्या गणेशोत्सवाच्या सुट्ट्यांमध्ये प्रत्येकाने आपल्या मूळ गावी किमान एक झाड लावावे. हे वृक्ष भविष्यातील पर्यावरण रक्षणासाठी अमूल्य ठरणार आहेत आणि आपल्या आईच्या नावाने लावलेले हे झाड आजीवन त्यांच्या आठवणीचे साक्षीदार राहील.'' ते पुढे म्हणाले ''या उपक्रमाचा उद्देश केवळ एक दिवसाचा कार्यक्रम करणे नसून विद्यार्थ्यांमध्ये कायमस्वरूपी पर्यावरणप्रेम रुजवणे आहे. आम्ही त्यांना शिकवत आहोत की वृक्षसंरक्षण हे केवळ सरकारी धोरण नसून प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे.

कार्यक्रमात वसतिगृहाचे अधीक्षक रामेश्वर जाधव आणि सहाय्यक अधीक्षक वैभव कांबळे यांनीही आपले महत्त्वपूर्ण विचार मांडले. त्यांनी विद्यार्थ्यांना वृक्षसंवर्धनाचे वैज्ञानिक व आर्थिक महत्त्व समजावून सांगितले.

## रक्षाबंधनसाठी माहेरी आलेल्या पत्नीला पतीकडून मारहाण

जालना :- राखी पौर्णिमेच्या निमित्ताने माहेरी आलेल्या विवाहितेस पतीकडून रस्त्यात अडवून शिवीगाळ, करून मारहाण आणि जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी येथील पाटाच्या पुलाजवळ घडली. किरण कौर संजयसिंह भादा (रा. बलीमामु दर्गा, शिवाजी पुतळ्याजवळ, जालना) यांनी तिर्थपुरी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्या आपल्या पतीसह जालना येथे राहत असून मजुरीचे काम करतात. दोन दिवसांपूर्वी त्या राखी सणानिमित्त माहेरी तिर्थपुरी येथे आल्या होत्या, काल दपारी आपल्या आजारी वडिलांना दवाखान्यात नेत असताना तिर्थपुरी पाटाच्या पुलाजवळ पती संजयसिंह भादा यांनी त्यांना रस्त्यात अडवले. माझ्यासोबत जालना चल असे सांगितले. मात्र, किरन यांनी राखीचा सण झाल्यावर येते असे सांगितल्यावर संतप्त होऊन पतीने त्यांना शिवीगाळ केली व डाक्यात मारहाण करून गंभीर दुखापत केली. तसेच जिवे मारून टाकीन अशी धमकी दिली. जखमी झाल्यानंतर किरन कौर यांनी तिर्थपुरी पोलिस ठाण्यात धाव घेतली. वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना ग्रामीण रुग्णालयात पाठवले. त्यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# जिल्ह्यात 'हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता' मोहिमेला सुरुवात

## ८ ते १५ ऑगस्ट दरम्यान अभियान राबविण्याचा संकल्प-सीईओ जितिन रहेमान

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्ताने हर घर तिरंगा ही मोहिम राबविण्यात येत आहे. या निमित्ताने पाणी व स्वच्छता या उपक्रमात श्रमदानाचा व लोक सहभागाचा उत्सव प्रत्येक गावात घ्यायचा आहे. त्यासाठी हर घर तिरंगा हर घर स्वच्छता ही मोहिम स्वतंत्रता का उत्सव स्वच्छता के संग या घोषवाक्य अंतर्गत केंद्र शासनाचा पेयजल व स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०८.०८.२०२५ ते दि. १५.०८.२०२५ या कालावधीत विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती व जिल्हावासियांनी सहभाग घ्यावा असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी केले आहे.



जिल्ह्यातील या मोहिमेच्या शुभारंभ प्रसंगी सर्व गटविकास अधिकारी सर्व विस्तार अधिकारी सर्व उपअभियंता तसेच गट व समूह समन्वयक यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता'' या मोहिमेची संकल्पना लोकसहभागातील उत्सव व ग्रामस्थांच्या एकात्मतेच्या भावनेवर आधारित आहे. ज्यामध्ये स्वातंत्र्याचा सार स्वच्छता व सुजलता या संकल्पनेशी जोडली गेली आहे. देशाचे पंतप्रधान यांची संकल्पना बळकट करण्यासाठी ग्रामीण भागात, स्वच्छ पाणी पुरवठा, शाश्वत स्वच्छता व आरोग्य सुनिश्चित करण्यासाठी (पाणी, स्वच्छता आणि आरोग्य) या मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेचा जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर दिनांक ०८ ऑगस्ट रोजी शुभारंभ करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व गावात स्वच्छ सुजल गाव करण्याबाबत ची प्रतिज्ञा गावातील ग्रामस्थ व शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातुन घेण्यात येणार आहे. दि. ९ ते ११ ऑगस्ट या कालावधीत सार्वजनिक स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये सार्वजनिक ठिकाणे, जलकुंभ, पाणी आणि स्वच्छता सुविधांची स्वच्छता करणे. गावातील विद्यार्थी/युवक/यांची स्वच्छता रॅली, वैयक्तिक घरगुती स्तरावर रांगोळी काढणे व स्वच्छता घटकांना रंगकाम करणे. नाल्यांची स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, पाण्याची गळती शोधणे व थांबवणे. सार्वजनिक शौचालय, घनकचरा व्यवस्थापन केंद्र, प्लास्टीक व्यवस्थापन केंद्र परिसरासह इतर सार्वजनिक ठिकणी स्वच्छता मोहिम राबवणे. प्लास्टिक कचरा संकलन मोहीम राबवून त्याच्या व्यवस्थापनाशी संबंधित तपासणी करणे. सार्वजनिक स्वच्छताः ''आझादी का श्रमदान'' ही मोहीम अत्यंत महत्त्वाचे असून सार्वजनिक ठिकाणासह रस्त्यांवर साफसफाई करणे आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

> "जिल्ह्यातील ९३४ गावांमध्ये खूप दिवसापासून पडलेले प्लास्टिक जमा करण्यासाठी विशेष श्रमदान मोहीम होणार असून यात जमा झालेल्या प्लास्टिक कचरा वर्गीकरण केंद्रामध्ये ठेवण्यात येणार आहे. या सर्व जमा झालेल्या प्लास्टिकचे पुनर्वापर करण्याबाबत नियोजन केले. असून भविष्यात प्लास्टिक होणार नाही यासाठी विशेष जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच खतखड्डा भरू आपले गाव स्वच्छ करू या उपक्रमात देखील भरलेल्या खतखड्यां मधून जैविक खत निर्मिती होईल असे नियोजन केले आहे. बचत गटाच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापनाचा उपक्रम शाश्वत स्वरूपात करण्यासाठी देखील ग्रामपंचायतीनी पुढाकार घेतला आहे.

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा वर्धापन दिन संपन्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**९ ऑगष्ट हा महाअंनिस चा वर्धापन दिन असतो . त्यानिमित पूर्वसंध्येला '' धर्मनिरपेक्षतेची बिकट वाटचाल'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई महाअंनिस चे अध्यक्ष, पत्रकार व लेखक, शेतकरी चळवळीचे नेते मा. अमर हबीब होते. प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी कॉंग्रेस चे डॉक्टर सेल चे राज्याध्यक्ष डॉ नरेंद्र काळे होते तर प्रमुख मार्गदर्शक महाअंनिस च्या राज्यप्रधान सचिव मा. रुक्साना मुल्ला होत्या . विशेष उपस्थिती म्हणून बीड जिल्हा महाअंनिस चे उपाध्यक्ष प्रा सुभाष धुळे, अंबाजोगाई महाअंनिस चे उपाध्यक्ष एस. बी. सय्यद सर व कॉ बब्रूवान पोटभरे सर होते.**



याप्रसंगी अंबाजोगाई शहरातील पुरोगामी विचाराचे पाईक हजर होते . सुधाकर तट,राजेसाहेब किर्दत, प्राचार्य दामोधर थोरात, संतराम कराड, अनंतराव जगतकर, नागनाथ तोंडारे, मुजिब काजी, महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा चे शिक्षक , बनेश्वर शिक्षण संस्थेचे शिक्षक, मराठवाडा शिक्षक संघटनेचे शिक्षक हजर होते . तसेच महा अंनिस च्या अंबाजोगाई शाखेच्या महिला रेखा देशमुख, तेलंग मॅडम, ज्योती चव्हाण उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाअंनिस चे जिल्हा कार्याध्यक्ष प्रदीप चव्हाण यांनी केले. सुत्रसंचलन अंबाजोगाई महाअंनिसचे कार्याध्यक्ष सूर्यकांत तेलंग यांनी केले . तर आभार पंडीत चव्हाण यांनी मानले . हा कार्यक्रम सक्सेस अकॅडमी, पवन हॉटेल शेजारी, बसस्टॅन्ड च्या मागे आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सक्सेस अकॅडमी व अंबाजोगाई महाअंनिस ने विशेष प्रयत्न केले.

## विद्यार्थिनींनी झाडांना राख्या बांधून दिला पर्यावरण रक्षणाचा संदेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय संस्कृतीत महत्वाचा मानला जात असलेला राखी पौर्णीमेचा सण देशात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो . या दिवशी बहिणी प्रेमाचे प्रतिक म्हणुन भावांना राख्या बांधतात आणि बहिणीचे रक्षण करावे तसेच त्यांच्या प्रिय भावास दीर्घायुष्य लाभावे, यासाठी देवाकडे प्रार्थना करतात.नेमका हाच संदेश वापरून योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी निसर्ग संवर्धन मंडळातंर्गत प्राचीन वृक्षांना म्हणजेच मातृवृक्षांना राख्या बांधून वृक्ष आमचे भाऊ असून ते दिर्घायुषी व्हावे व प्रदूषणाच्या दैत्यापासून आमचे रक्षण करावे अशी प्रार्थना केली.



वसतीगृहाचे ग्रहपाल, शिक्षिका यांच्या मार्गदर्शनात हा आगळा वेगळा उपक्रम राबवुन वृक्ष संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

सर्वत्र होणाऱ्या वृक्ष तोडीमुळे निसर्गाचा समतोल बिघडला परिणामी ग्लोबल वार्मिंगचा प्रश्न जागतिक समस्या बनली .यावर उपाय म्हणुन वृक्ष लागवडी सोबतच वृक्षसंवर्धनाची गरज ओळखुन या विद्यार्थीनी राखीपौर्णिमेनिमीत्त परिसरातील वृक्षांना वृक्षरक्षा बंधन करण्यात आले . सदर उपक्रम केवळ औपचारिकता म्हणुन न राबविता वेळोवेळी या वृक्षांच्या सुरक्षिततेची खात्री करून व वेळ पडल्यास त्यांच्या सुरक्षिततेसाठी संघर्ष करण्याचा मानस सुद्धा विद्यार्थिनींनी यावेळी व्यक्त केला. रक्षाबंधनासाठी विद्यार्थीनींनी पर्यावरणाला हानीकारक असणाऱ्या घटकांना वगळुन वृक्ष रक्षाबंधन केले. या प्रसंगी निसर्ग संवर्धन मंडळ,योगेश्वरी विद्यार्थी वसतीगृह यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## आईच्या दुधाने बाळाचा बौद्धिक विकास होतो - डॉ. स्वाती शिंदे



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**आईच्या दुधाने बाळाचा बौद्धिक विकास तर होतोच. पण त्याचबरोबर त्याची प्रतिकारशक्ती देखील वाढते. आणि म्हणूनच या मातेच्या दुधाला पहिली लस असे देखील संबोधले जाते. असे प्रतिपादन येथील प्रसिद्ध आहार तज्ज्ञ डॉ.स्वाती अतुल शिंदे यांनी केले.**

लोखंडी सावरगाव येथील स्त्रीरुग्णालयात रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने''स्तनपान जनजागृती व स्तनदा माता बालकांचे आरोग्य या एकदिवसीय मार्गदर्शन शिबिर'' आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.स्वाती शिंदे बोलत होत्या. यावेळी मंचावर स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.चंद्रकांत चव्हाण, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. चेतन आदमाने,रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंकी,सचिव मंजुषा जोशी , स्वरूपा कुलकर्णी, डॉ.अलका तडकलकर , गीता कुलकर्णी , योग शिक्षिका मंदाकिनी गीते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना स्वाती शिंदे म्हणाल्या की बाळ जन्माला आल्यानंतर त्याला काही वेळानंतर पहिल्यांदा आईचेच दुधपाजले पाहिजे. कारण तेच त्याच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक असते. परंतु, आजकालच्या महिला त्या विसरत चालल्या आहेत की काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.या प्रसंगी बोलताना डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनीही मार्गदर्शन केले यावेळी प्रा.रोहिणी पाठक यांनी महिलांना प्रश्नोतरातून ''आईच्या दुधाची बँक'' या उपक्रमा बाबत जनजागृती केली.यावेळी डॉ.चेतन आदमाने यांनीही स्तनदा मातांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प प्रमुख स्वरुपा कुलकर्णी यांनी केले. संचलन सीमा पार्डीकर. यांनी तर उपस्थितांचे आभार सचिव मंजुषा जोशी यांनी मानले. या कार्यक्रमास रुग्णालयातील परिचारिका व कर्मचारी उपस्थित होते.

## सन १९८४-८५ दहावी बॅचकडून जि.प.शाळेला पितळी समई भेट

चौसाळा । प्रतिनिधी

येथील जि.प.मा या शाळेतील १९८४ ८५ दहावी वर्ग बॅच वर्गमित्र मैत्रिणी यांचा स्नेहमिलन मेळावा कार्यक्रम दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी चौसाळा जि.प. शाळेत ठेवण्यात आला होता



या कार्यक्रमास तब्बल ४० वर्षानंतर दहावीच्या बॅचचे सर्व मित्र-मैत्रिणी एकत्र आले होते ६० ते ७० जण उपस्थित होते हे स्नेह मिलन कार्यक्रम अगदी खेळीमेळीच्या वातावरणात व मोठ्या उत्साहात संपन्न झाला चाळीस वर्षानंतर सर्वांच्या भेटी झाल्याने सर्व अगदी आनंदी झाले होते

या स्नेह मिलन मेळावा प्रसंगी सर्वांच्या मते आपण या शाळेत शिकलो त्या शाळेसाठी दहावीच्या वतीने शाळेला समई देण्याचे ठरवले होते त्यानुसार दि.४ ऑगस्ट २०२५ रोजी सोमवार चौसाळा जि.प शाळेत सर्व वर्गमित्राच्या व सेवानिवृत्त शिक्षक श्री पोथरकर सर शाळेच्या मुख्याध्यापिका पद्मजा हंपे मॅडम सर्व शिक्षिका विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत १६ किलो वजनाची पितळी समई सप्रेम भेट देण्यात आली या कार्यक्रमास दहावी बॅचे श्री प्रेमचंद ललवाणी (पुणे) माजी सरपंच राजेश आप्पा नाईकवाडे प्रा. विलास भिल्लारे पत्रकार बळीराम राऊत माजी ग्रामसेवक भागवत जोगदंड, उत्तम कांबळे सर, प्रभाकर आंधळे सर, माजी पत्रकार विनोद शिंदे, गोलेकर, बापू गायकवाड ,रवींद्र खडके, आनंद खडके, रामदास काशीद, रौफ जहागीरदार, एल बी पिंपळे, पांडुरंग औताडे , शिवकन्या चव्हाण तसेच सर्व शिक्षक शिक्षिका विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते या वेळी प्रा.भिल्लारे आंधळे सर ललवाणी यांनी मनोगत व्यक्त केले तर प्रास्ताविक काकड सर यांनी केले तर आभार प्रदर्शन घोडके सर यांनी मानले यापुढे शाळेच्या बांधकामासाठी ही मदत देण्याचे जाहीर केले.

## जाफ्राबादच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही -महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

जालना । प्रतिनिधी

राज्यातील जनतेसाठी राज्य शासन विविध लोककल्याणकारी लोकाभिमूख योजना राबवून गतिमान आणि पारदर्शक पद्धतीने काम करीत आहे. विकासाच्या संकल्पनेत जनतेचा सहभाग महत्त्वाचा आहे. प्रत्येक विकासाचे काम गुणवत्तापूर्ण होण्यासाठी त्याच्यावर लक्ष ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. समाजाच्या शेवटच्या नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन काम करत असून, जाफ्राबादच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी निः संदिग्ध ग्वाही राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी दिली.

जाफ्राबाद शहरातील ऐतिहासिक असलेल्या ४९ कोटी ४३ लाख रुपयांची पाणी पुरवठा योजना तसेच ५ कोटी रुपयांचे बसस्थानक बांधकामासाठी आणि ३ कोटी रुपयांची ई-बस चार्जिंग स्टेशन विकास कामांचा भूमिपूजन सोहळा आज पार पडला. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी खासदार डॉ कल्याण काळे, आमदार संतोष दानवे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, नगराध्यक्ष सुनिता लहाने, माजी



नगराध्यक्ष राजाभाऊ देशमुख, भास्कर दानवे, बद्री पठाडे, तहसीलदार श्रीमती सारिका भगत , जाफराबाद नगरपंचायत चे मुख्याधिकारी सुरज बिस्कीटे आदींची उपस्थिती होती. महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्रात तुकडेबंदी कायदा हटविण्यात असून, या नियमामध्ये बदल केल्यामूळे नागरिकांना त्याचा लाभ मिळत आहे. त्यासोबतच जनतेला आपल्या मालमत्तेसंदर्भात स्वामित्व मिळावे यादृष्टीने बदल करण्यात आला आहे. तसेच शेत/पाणंद रस्ता हा शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताला रस्ता मिळावा या उद्देशाने शासनाने १२ फुटांचा रस्ता करण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे राज्यातील ५० लाखांहून अधिक नागरिकांना दिलासा मिळणार आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नगरोथान योजनेअंतर्गत जाफ्राबाद शहरास भूमिगत ड्रेनेज साठी निधी देणार. जाफ्राबाद तालुक्यात खूप चांगले मिरचीची उत्पादन होत आहे. येथील शेतकऱ्यांनी तालुक्यात हरित क्रांती घडवून आणली आहे. हे सरकार राज्याच्या विकासासाठी प्रयत्नशील आहे. विकासाच्या कामासाठी सर्वांनी एक येणे आवश्यक आहे. विकासाच्या कामामध्ये जनतेचा सहभाग महत्वाचा आहे. जलजीवन मिशनकडे आपणास लक्ष द्यावे लागणार आहे. आज रक्षाबंधनाच्या निमित्ताने जाहीर करतो की लाडकी बहीण योजना नियमित सुरू ठेवून येणाऱ्या काळात वाढीव २१०० रुपये देणार आहोत. घरगुती विजेचे दर वाढत आहे यासाठी मुख्यमंत्री यांनी नियोजन केले आहे. प्रत्येक घरकुलावर ४० हजार रुपयांचे सूर्यघर देणार आहे. तुकडेबंदी कायदा हटविला आहे. प्रॉपर्टी कार्ड देण्याचे काम करणार असल्याचे श्री बावनकुळे यांनी यावेळी सांगितले कार्यक्रमाचे प्रास्ताविक आमदार संतोष दानवे यांनी केले. तर यावेळी खासदार डॉ कल्याण काळे, आमदार संतोष दानवे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, नगराध्यक्ष सुनिता लहाने आदींची समयोचित भाषणे झाली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नवीन बसस्थानक बांधकाम आणि ई-बस चार्जिंग स्टेशन विकास काम आणि जाफ्राबाद शहरातील पाणी पुरवठा योजनाचे भूमिपूजन सोहळा नियोजित बसस्थानक परिसरात आज पार पडला. यावेळी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक, नगरसेवक, पदाधिकारी व संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.


## पान ६ वरुन...


### दिल्लीत केंद्रीय मंत्र्यांच्या

१० व्या पुण्यतिथीनिमित्त १२ ऑगस्ट २०२५ रोजी दिल्ली येथे डॉ. कलाम युथ स्टार्टअप अवॉर्ड- २०२५ कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्तरावरील स्टार्टअपबद्दल तरुणांना जागरूक करण्यासाठी राष्ट्रीय अल्पसंख्याक मोर्चाने देशभरातील अल्पसंख्याक समुदायातील प्रतिभावान तरुणांना ''डॉ. कलाम स्टार्टअप युथ अवॉर्ड २.० '' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार नवोन्मेष, अपवादात्मक कौशल्ये आणि उद्योजकीय वृत्तीद्वारे स्वतःचे उद्योग सुरू करणाऱ्या आणि समाजासाठी प्रेरणादायी उदाहरण म्हणून काम करणाऱ्या तरुणांना दिला जाणार आहे. दिल्लीत दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी होणाऱ्या कार्यक्रमास केंद्रीय मंत्र्यांसह देशभरातील भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याची माहिती भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री तथा अभियानाचे प्रदेश प्रभारी सलीम जहाँगीर यांनी दिली.

### भागवत केकान यांचे

लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष मधुकर सानप, सचिव विष्णू मिसाळ,मा. चेअरमन दिलीप जायभाये, उद्धव मिसाळ, महारुद्र केकान, संचालक गोरक्ष मिसाळ,अनंत सानप, सुभाष सांगळे, केंद्रप्रमुख सुनील खेडकर,जितेंद्र सांगळे, रवींद्र सोनवणे, खेडकर विष्णू, विकास डोके,यांच्यासह शिक्षक बांधव व ग्रामस्थ राजकीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी सोवनने यांनी केले तर आभार मधुकर सानप यांनी मानले.

### आजपासुन पांढरी- वांढरे वस्ती

पारायण,नामजप, हरिपाठ,कीर्तन नंतर जेवणाची पंगत आणि जागर होणार आहे.रविवारी नामधारक ह.भ.प. आसाराम महाराज केळसांगवीकर यांचे नामजप सोमवारी ह.भ.प.नानासाहेब महाराज भोगाडे (पांढरी), मंगळवारी ह.भ.प. काकासाहेब महाराज निगुडे (अरणगांव), बुधवारी ह.भ.प. चैतन्य महाराज राठोड (आळंदी),गुरुवारी ह.भ.प.पुष्पाताई महाराज जगताप (तवलवाडी), शुक्रवारी ह.भ.प.शिवाजी महाराज जगताप (टाकळसिंग), शनिवारी ह.भ.प.शिवानंद महाराज पाटील (नाशिक),रविवार दि. १७ आगस्ट रोजी सकाळी १० ते १२ ह.भ.प. कैलास महाराज भोरे (देवदैठण भोरदरा) यांचे काल्याचे कीर्तन होईल नंतर महाप्रसादाची सामुदायिक पंगत होणार आहे असे आवाहन सप्ताह संयोजन समितीने केले.

### आ.नमिता मुंदडा यांचा

निशिगंध,शुभांगीताई गडकर,अनिताताई चोपणे,शितलताई निशिगंध,पुष्पा ताई शिंदे,प्रेमाताई पाटील,कमलताई सातपुते यांनी सर्व पोलीस बांधवांना राख्या बांधल्या. यावेळी उत्तरेश्वर स्वामी,गडकर नाना,सुरेश मुकदम,शिवराज बोरगावकर,वैजनाथ थळकरी,नागेश मुकदम,हनुमंत थळकरी,सुर्यकांत थळकरी,बबनराव शिंदे,सरपंच सुरेश नांदे,मल्लिकार्जुन गडकर,विकास जाधव,सरपंच युवराज ढोबळे,महारुद्र चोपणे,विजय भुमकर,शिवहर लामतुरे,सुनील गुजर,गणेश निकम,दिलीप पोळ,सरपंच सुदाम पाटील,विजयकुमार इखे,केशव भांगे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

### जागतिक आदिवासी दिनानिमित्त

तालुक्यातील समाज हा तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला. त्याचबरोबर जातींचे प्रमाणपत्र चा कॅम्प आहे तरी सर्व समाजबांधवानी त्याचा फायदा घेऊन आपापली प्रमाणपत्रे काढून घ्यावी असे आवाहन त्यांनी केले. यावेळीमहादेव कोळी समाजाच्या प्रत्येक कार्यक्रमात तन,मन, धनाने काम करणारे दत्तात्रय माने पाटील यांनी बोलताना म्हणाले की,कोळी समाजाच्या प्रत्येक समस्या सोडविण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करत असून आपली एकजुट हीच आपल्या विकासाची नाळ आहे असे ते म्हणाले यावेळी ओबीसी नेते प्रा.वैजेनाथ शिंदे महादेव कोळी समाजाचे नेते दत्तात्रय माने पाटील कृष्णा जाधव, प्रकाश माने, अजित जाधव,तात्या माने, सोमनाथ पाटस्कर,नारायण देवकुळे, भागवत माने,सचिन पंधारे आदींची उपस्थिती होती.

# दिव्यांग शेतकऱ्याची कमाल!

## २ हेक्टरात लिंबातून कमावतोय २२ लाख

महाराष्ट्रातील बीड जिल्हा हा दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. सरासरीहून कमी पडणारा पाऊस आणि दुष्काळाच्या गर्तेत अडकलेल्या बीडमध्ये एका दिव्यांग शेतकऱ्यानं कमाल करून दाखवलीय. दोन हेक्टर क्षेत्रात शशिकांत गणेश इंगोले नावाच्या शेतकऱ्याने पारंपारिक शेतीला सोडून आपल्या शेतात लिंबू लावण्याचा एक अनोखा प्रयोग केलाय. दोन हेक्टर क्षेत्रात ५५० झाडे लावत हा शेतकरी केवळ लिंबातून दरवर्षी २० ते २२ लाख रुपये कमावतोय. कोणतंही रासायनिक खत न वापरता कमीत कमी पाण्यात या लिंबू उत्पादनाने बळ दिलंय . लिंबाचे झाड जिवंत ठेवण्याच्या तंत्रामुळे या शेतकऱ्याची गावात एकच चर्चा आहे.

शेतकरी इंगोले म्हणतात, मी एक दिव्यांग शेतकरी आहे. या बागेच्या लागवडीसाठी मी, माझ्या पत्नीने आणि माझ्या पालकांनी मिळून लिंबूचे पीक लावले आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही पिकात त्यांची बुद्धिमत्ता वापरली पाहिजे. लिंबाचे अधिक उत्पादन घेण्यासाठी, उन्हाळ्यात झाडे जिवंत ठेवण्यासाठी मी एक नवीन तंत्र अवलंबले आहे. जून आणि जुलैमध्ये येणारी फुले नष्ट करण्यासाठी युरियाचा वापर करावा लागतो. त्यानंतर जानेवारी आणि फेब्रुवारीमध्येही त्याचा वापर करावा लागतो. पावसाळ्यात जास्त उत्पादन होते हे आपण अनेक वेळा पाहिले आहे. तथापि, हे टाळण्यासाठी





आणि उन्हाळ्यात जास्त उत्पादन मिळविण्यासाठी वेगवेगळ्या तंत्रांचा वापर करावा लागतो.

दुष्काळातही लिंबाचे चांगले उत्पादन

शेतकरी इंगोले म्हणाले, कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार आणि माझ्या काही तंत्रांनुसार, मी उन्हाळ्यात जास्त लिंबू उत्पादन करतो. किसान तक ला दिलेल्या माहितीनुसार, या झाडांना पाच वर्षे पूर्ण झाली आहेत, म्हणून मी त्यांच्यापासून ३० लाख रुपयांचे उत्पादन घेतले आहे. एकूण ६६६ झाडे होती. त्यापैकी काही झाडे कमी झाली आहेत. या वर्षी मी ४० लाख रुपयांपर्यंत उत्पादन घेईन. मी या बागेत नैसर्गिक खताचा मुबलक वापर करत आहे. मी इतर कोणतेही रासायनिक खत वापरत नाही, म्हणून ही बाग चांगली फळे देत आहे. मी त्याचे पूर्णपणे नियोजन केले आहे. असंही ते सांगतात .

यामुळे मिळतंय लाखोंचं उत्पन्न

इंगोलेच्या लागवडीबाबत बीडचे कृषी सहाय्यक विकास सोनावतीकर म्हणतात, कृषी विभागाने राबविलेल्या रोजगार हमी योजनेसोबतच आम्ही या बागेसाठी भाऊसाहेब फंडकर योजना देखील राबवली आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना खूप मदत होत आहे. बीड शहराजवळ असल्याने येथे लिंबूवर्गीय पिकांना मोठी मागणी आहे. बीड कृषी विभागात पाच हेक्टर क्षेत्रात लिंबूवर्गीय पिकांची लागवड करण्यात आली आहे. आता या भागातील अनेक शेतकरी या बागेची पाहणी करण्यासाठी येतात आणि ते स्वतः लागवड करण्यास तयार आहेत. अनेक शेतकरी शशिकांत इंगोले यांचे मार्गदर्शन घेतात, त्यामुळे हे फळ पिक मोठ्या प्रमाणात लावण्याची शक्यता निश्चितच आहे. शशिकांत इंगोले पावसाळ्यात उमलणाऱ्या फुलांना टाळतात आणि ते तोडतात. उन्हाळ्यात उमलणाऱ्या फुलांपासून ते फळे घेतात, त्यामुळे उत्पादन जास्त मिळते.

### लिंबातूनही मिळू शकते चांगले उत्पन्न

बीड जिल्ह्यातील शेतकरी दुष्काळाचा सामना करत असताना, शशिकांत इंगोले यांनी एक अनोखा प्रयोग करून कागदी लिंबाची बाग लावली आहे. या बागेचे अनुकरण करून, बीड जिल्ह्यातील अनेक शेतकरी आता लिंबू पिकांकडे वळत आहेत. लिंबू कोणत्याही हंगामात लावता येते आणि दुष्काळाचा त्याचा परिणाम होत नाही. दुष्काळातही लिंबा पासून चांगले उत्पादन मिळू शकते.

# ऊस पोक्का बोइंग रोग नियंत्रण

पोक्का बोईंग हा ऊस पिकावरील बुरशीजन्य रोग आहे. याचा प्रादुर्भाव साधारणपणे पावसाळ्यात किंवा जून ते सप्टेंबर या काळात दिसून येतो. पोक्का बोईंग फ्युसेरियम मोनिलिफॉर्मी या बुरशीमुळे पसरते. शीर्ष भेदक कीटकां प्रमाणे झाडाच्या वरच्या भागावर परिणाम करते. लक्षणांमधील या समानतेमुळे अनेकदा शेतकरी रोगाचे चुकीचे निदान करून पिकामध्ये चुकीच्या बुरशीनाशकाचा वापर करतात. या रोगाचा जास्त प्रादुर्भाव झाल्यामुळे उसाच्या रोपाला वाढीसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते, जे प्राथमिक अवस्थेत नियंत्रण पद्धतीवर लक्ष देऊन काही प्रमाणात कमी करता येते. या रोगास को ४१९, कोसी ६७१, व्हीएसआय ४३४, को ८६०३२, एमएस १०००१ आणि कोव्हीएसआय ९८०५ या ऊस जाती बळी पडतात.

पोक्का बोइंग मुळे पिकांचे होणारे नुकसान : रोगाच्या सुरुवातीच्या अवस्थेत, वरची पाने देठाच्या जोडणीवर पिवळी आणि पांढरी होतात. काही दिवसांनी लालसर तपकिरी होऊन सुकतात. शेणखताचा जास्त प्रादुर्भावामुळे पाने एकमेकात गुंतलेली आणि दोऱ्या सारखे दिसतात. कुजतात आणि पडतात. नवीन येणारी पाने इतर पानांपेक्षा लहान असतात. पिकातील प्रकाश संश्लेषण प्रक्रियेवर परिणाम होऊन झाडांची वाढ खुंटते.

पोक्का बोईंग रोगाचा प्रसार : ऊसातील पोक्का बोइंग या रोगाचा प्रसार प्रामुख्याने हवेमार्फत होतो. याशिवाय पाणी, पाऊस व कीटकांद्वारेदेखील या रोगाचा प्रसार होतो; मात्र रोगाचा प्रसार बेण्याद्वारे होत नाही. पावसाळा हंगामापूर्वी पडलेल्या वळीव पावसामुळे हवेत आर्द्रता वाढते. त्या वेळी पोक्का बोंग या रोगास कारणीभूत असणाऱ्या फुर्जेरियम मोनिलीफॉरमी या हवेद्वारे पसरणाऱ्या बुरशीची लागण उसाच्या शेंड्याकडील कोवळ्या पानांवर दिसून येते. उसामध्ये सुरुवातीस तिसऱ्या व चौथ्या पानांच्या बेचक्यात पांढरट पिवळसर पट्टे दिसून येतात.सुरकुत्या पडून पाने आकसतात. त्यांची लांबी घटते. अति तीव्रतेमध्ये पाने सडतात किंवा कुजतात. नंतर गळून पडतात किंवा एकमेकांत गुरफटतात. काही वेळा पोंगेमर किंवा शेंडा कुज दिसून येते. रोगग्रस्त उसाच्या कांड्या वर कांडी काप सारखी लक्षणे दिसून येतात. रोगट उसाच्या कांड्या आखूड झाल्याने व पांगशा फुटलेल्या उसाच्या उत्पादनात घट येते.पोक्का बोइंग या रोगाचा प्रादुर्भाव : राज्यातील सर्व हवामान विभागात रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो. जास्त पर्जन्यमानाच्या ठिकाणी हवेमध्ये वाढलेली आर्द्रता जास्त काळ राहिल्याने रोगाचे प्रमाण वाढते. मॉन्सूनपूर्व वळीव पाऊस झाल्यावर रोगाचा प्रादुर्भाव ऊसाच्या पोग्यात किंवा कोवळ्या पानांवर दिसून येतो.पोक्कासाठी एकात्मिक उपाययोजना : रोगामुळे शेंडे कुज व पांगशा फुटलेले ऊस शेतातून वेगळे काढावे व नष्ट करावेत, जेणेकरून रोगाच्या प्रसारास काही प्रमाणात आळा बसेल. माती परीक्षणावर आधारित रासायनिक खतांची (मुख्य व सुक्ष्म अन्नद्रव्यांची) मात्रा वेळेवर व योग्य प्रमाणात द्यावी. बोरॉन या सूक्ष्मअन्नद्रव्याची कमतरता असेल तर या रोगाची तिव्रता वाढते.

# केळीवरील कुकुंबर मोझॅक रोगाचे नियंत्रण

केळी पिकावर विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत असतो. बदलते वातावरण आणि ढगाळ हवामान यामुळे रस शोषणाऱ्या किडी चा प्रादुर्भाव जास्त दिसून येतो. गेल्या २-३ वर्षांपासून केळीवर ककुंबर मोझॅक विषाणू (सी.एम.व्ही.) प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून येत आहे. स्थानिक भाषेत या रोगास 'हरण्या' असे म्हटले जाते. या रोगाच्या प्रादुर्भावामुळे केळी उत्पादनात मोठी घट येते. विषाणूजन्य रोगाचे नियंत्रण करणे शक्य नसले तरी रोगाचा प्रादुर्भाव टाळणे आणि प्रसार रोखणे शक्य आहे. यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंब फायदेशीर ठरतो.

अनुकूल घटक : सततचे ढगाळ वातावरण, सतत पाऊस, कमी तापमान, जास्त आर्द्रता हे घटक रोगाच्या वाढीसाठी पोषक ठरतात. यासोबतच रोगयुक्त लागवड साहित्य, तन नियंत्रणाचा अभाव, अन्नद्रव्यांची कमतरता हे घटक रोगाच्या प्रादुर्भावास कारणीभूत आहेत. रोगाचा प्राथमिक प्रसार लागवड साहित्य मार्फत आणि दुय्यम प्रसार 'मावा' किडी मार्फत होतो. या विषाणूची जवळपास ८०० ते १००० यजमान पिके आहेत. यात काकडी, भोपळा, कारली, दुधीभोपळा, गिलके, चवळी, टोमॅटो, वांगी, मिरची तसेच एकदल व द्विदल पिकांचा समावेश होतो. पीक फेरपालट पद्धतीचा अभाव हे देखील प्रमुख कारण आहे.

लक्षणे : सुरुवातीला कोवळ्या पानांवर हरितद्रव्य विरहित, पिवळसर पट्टे दिसतात. हे पट्टे तुटक किंवा संपूर्ण पानावर आढळून



येतात. एका पानावर १ ते २ अर्धवट आकाराचे किंवा पूर्ण पानभर पसरलेले पट्टे दिसतात. कालांतराने पानाचा पृष्ठभाग आकसला जाऊन कडा वाकड्या होतात. पानांचा आकार लहान होतो. नवीन येणारी पाने आकाराने लहान होतात. पानाच्या देठाची लांबी कमी होऊन पाने जवळ येतात. पानांच्या शिरा ताठर होऊन संपूर्ण पान कडक होते. पान हाताने दाबल्यास कडकड आवाज होतो. पानांच्या शिरांमधील भाग काळपट पडून तेथील उती मरतात. पाने फाटतात. प्रादुर्भाव जास्त झाल्यास, पाने पिवळी पडून पोंगा सडतो. झाडांची वाढ खुंटते. प्रादुर्भावग्रस्त झाडांची निसवण उशिरा तसेच अनियमित होऊन फण्या अत्यंत लहान होतात. फळे विकृत आकाराची होऊन त्यावर पिवळ्या किंवा काळ्या रंगाच्या रेषा दिसतात. अशी विक्रीसाठी योग्य नसतात.

नियंत्रण : केळीची बाग व्हायरस मुक्त ठेवण्यासाठी मशागतीच्या पद्धती व व्हेक्टरचे नियंत्रण महत्वाचे आहे. केळी लागवडीसाठी रोग मुक्त व व्हायरस इंडेक्सिंग केलेल्या टिश्यू कल्चर रोपांची लागवड करावी. बाग तण मुक्त ठेवावी कारण अनेक तणे रोगाची जोपासना करतात. बागे शेजारी मका, कापुस, चवळी, काकडी, घोसाळे, टोमॅटो, टरबुज, मिरची, ऊस या सारख्या पिकांची लागवड करु नये. जुलै, ऑगस्ट,सप्टेंबर, नोव्हेंबर व डिसेंबर च्या लागवडीवर सीएमव्ही रोग येण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे या लागवडीची विशेष काळजी घ्यावी. रोगांचा प्रसार करणाऱ्या रसशोषक क़िडींचा वेळीच बंदोबस्त करणे गरजेचे आहे. सीएमव्ही रोगग्रस्त झाडातुन व्हायरस मुक्त होऊ शकत नाही त्यामुळे रोगग्रस्त झाडे उपटून टाकावी. क्लोरोपायरीफॉस, टर्मिनेटर, ऍग्रोसिस, ४५ मिली + निमअर्क ५० मी + स्टिकर २५ मिली १५ लि. पाण्यात किंवा असिटामॅप्रिड, धनप्रीत, धानुका, ६ ग्रॅम + निमअर्क ५० मी + स्टिकर २५ मिली १५ लि. पाण्यात घेवून आठवड्याच्या अंतराने फवारणी करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६७५ : चार्ल्स (दुसरा) याने ग्रीनीच येथील जगप्रसिद्ध वेधशाळेचा शिलान्यास केला.
१८१० : 'स्मिथसोनियन इन्स्टिट्युशन' ची स्थापना झाली.
१८२१ : मिसुरी हे अमेरिकेचे २४ वे राज्य बनले.
१९८८ : दुसर्‍या महायुद्धात बेकायदेशीरपणे बंदिवासात टाकलेल्या किंवा हद्दपार केलेल्या जपानी वंशाच्या अमेरिकन नागरिकांना राष्ट्रपती रोनाल्ड रेगन यांनी प्रत्येकी २०,००० डॉलर भरपाई देण्याचे कबूल केले.
१९९० : मॅगेलान हे अंतराळयान शुक्रावर पोचले.
१९९९ : औषधांच्या दुकानांत विकल्या जाणार्‍या औषधांत प्राणिज पदार्थ असल्यास त्याचा उल्लेख वेष्टणावर करणे अनिवार्य असल्याचा केंद्रसरकारच्या सामाजिक न्याय खात्याचा निर्णय. सामिष
१९९९ : 'इंडियन फिजिक्स असोसिएशन' तर्फे देण्यात येणारा 'डॉ. मो. वा. चिपळोणकर स्मृती पुरस्कार' डॉ. निवास पाटील व डॉ. प्रकाश तुपे यांना जाहीर

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५५ : नारायणराव पेशवा ५ वा पेशवा (मृत्यू: ३० ऑगस्ट १७७३)
१८५५ : 'गान सम्राट' उस्ताद अल्लादियाँ खाँ जयपूर -अत्रौली घराण्याचे संस्थापक व कोल्हापूर दरबारचे प्रसिद्ध गायक (मृत्यू: १६ मार्च १९४६)
१८६० : पं. विष्णू नारायण भातखंडे संगीतशास्त्रकार, हिन्दुस्थानी संगीताचे प्रसारक, संशोधक व गांधर्व महाविद्यालयाचे एक संस्थापक (मृत्यू: १९ सप्टेंबर १९३६)
१८७४ : हर्बर्ट हूव्हर अमेरिकेचे ३१ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २० आक्टोबर १९६४)
१८९४ : व्ही. व्ही. गिरी भारताचे चौथे राष्ट्रपती, लोकसभा सदस्य आणि केंद्रीय मंत्री (मृत्यू: २३ जून १९८०)
१९०२ : नॉर्मा शिअरर कॅनेडियन अमेरिकन अभिनेत्री (मृत्यू: १२ जून १९८३)
१९१३ : डॉ. अमृत माधव घाटगे संस्कृत व प्राकृत विद्वान (मृत्यू: ८ मे २००३)
१९६० : देवांग मेहता भारताच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एक अग्रणी व्यक्तिमत्त्व आणि नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्विस कंपनीज चे अध्यक्ष (मृत्यू: १२ जुलै २००१)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४२ : हुतात्मा शिरीषकुमार (जन्म: २८ डिसेंबर १९२६)
१९५० : खेमचंद प्रकाश संगीतकार (जन्म: १२ डिसेंबर १९०७)
१९८० : जनरल ह्याह्याखान पाकिस्तानचे ३ रे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ४ फेब्रुवारी १९१७)
१९८२ : मनाली कल्लट तथा एम. के. वैणू बाप्पा भारतीय खगोलशास्त्रज्ञ. तार्‍यांची प्रत आणि त्यांच्या वर्णपटातील परस्परसंबंधांची उकल केली. (जन्म: १० एप्रिल १९२७)
१९८६ : जनरल अरुणकुमार वैद्य यांची अतिरेक्यांनी पुणे येथे हत्या केली. १९६५ आणि १९७१ च्या भारत पाकिस्तान युद्धात अतुलनीय शौर्य गाजवल्याबद्दल त्यांना 'महावीरचक्र' मिळाले होते. त्यांच्या लष्करप्रमुखपदाच्या काळातच 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार'ची कारवाई झाली होती. (जन्म: २७ जानेवारी १९२६)
१९९२ : लेफ्टनंट जनरल शंकरराव पांडुरंगराव (पाटील) तथा एस. पी. पी. थोरात यांचे निधन. संयुक्त राष्ट्रसंघाने शांतता प्रस्थापनेसाठी कोरियात पाठवलेल्या शांतिसेनेचे ते सेनापती होते. कीर्तिचक्र, पद्मश्री, सावरकर पुरस्कार असे अनेक मानसन्मान त्यांना मिळाले होते. (जन्म: १२ ऑगस्ट १९०६)
१९९७ : नारायण पेडणेकर कवी व नाट्यसमीक्षक (जन्म:)
२०१२ : सुरेश दलाल साहित्य अकादमी पुरस्कार विजेते गुजराथी कवी, लेखक आणि संपादक (जन्म: ११ आक्टोबर १९३२)

# ऊस बेणे मळ्याचे व्यवस्थापन

कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस लागवडीखालील जमिनीची पाच भागांमध्ये विभागणी करावी. प्रत्येक वर्षी एका भागात बेणे बदल करावा. साधारणपणे गवताळ वाढ, काणी, रेड रॉट आणि वायएलडी अशा रोगामुळे ऊस उत्पादनामध्ये १० टक्के घट येऊ शकते. ही घट बेणे बदल करून टाळता येऊ शकते.

लागण वेळ : बेण्याचे वय ८ ते १० महिन्यांचे असताना तोडले जावे. शेतकरी कोणत्या महिन्यात जास्त लागण करतो, त्यानुसार पाठीमागे जाऊन बेणे मळा लागण करावी.

जमीन : जमीन ही क्षारपड, चोपण किंवा पाणथळयुक्त नसावी. बेणेमळा हा कारखाना कार्यक्षेत्राच्या विविध गटांत आणि वेगवेगळ्या जातींचा घेतलेला असावा. शेतकऱ्यांना बेणे वितरणासाठी सोयीचे असावे. बेणे मळ्यापासून चांगल्या रस्त्याची सोय असावी त्यामुळे वाहतूक खर्च कमी करता येईल. बेणे मळ्यासाठी प्रगतिशील शेतकऱ्यांची निवड करावी. मूलभूत बियाणे हे कारखाना रोपवाटिका किंवा संशोधन केंद्रावरून आणलेले असावे. त्याचे गुणन करून बेणे मळ्यासाठी वापरावे.

जमीन मशागत : चांगली खोलवर नांगरट करून उभी-आडवी वखरणी करावी. उसाच्या चांगल्या वाढीसाठी जमिनीत २५ ते ३० टन एवढे चांगले कुजलेले शेणखत दुसऱ्या वखरणी अगोदर मिसळून मातीआड करावे किंवा शेणखत उपलब्ध नसेल तर १० टन चांगली कुजलेली प्रेसमड मिसळावी किंवा ५ टन गांडूळ खताचा वापर करावा.

बेणे : बेण्याची निर्मिती एक डोळा, दोन डोळा, कांडी किंवा उती संवर्धित रोपांपासून केली जाते. बेण्यासाठी लागण केलेला ऊस तोडण्यापूर्वी ६ आठवडे अगोदर अतिरिक्त नत्र खताची मात्रा द्यावी त्यामुळे कांडीतील रसरशीतपणा व पोषणद्रव्य वाढून बेण्याची उगवण क्षमता वाढीस लागते. व्यवस्थितरीत्या पाला काढून बेणे धारदार कोयत्याने थोडे तिरक्या पद्धतीने एका झटक्यात तोडावे म्हणजे कांडी फुटणार नाही किंवा डोळा खराब होणार नाही, शक्यतो बेणे शेतावर नेऊन तिथेच तोडून बेणे प्रक्रिया करून लागण करावी. मूळकुज, कांडीकुज यांसारख्या रोगांच्या नियंत्रणासाठी १०० लिटर पाण्यात १०० ग्रॅम कार्बेन्डाझिम मिसळून त्यामध्ये बेणे १० ते १५ मिनिटे भिजत ठेवावे.

सरीरातील अंतर : जमिनीच्या पोताप्रमाणे ४.५ ते ५.० फूट १५ ते २० सेंटिमीटर दोन डोळ्यांतील अंतर ठेवून लागण करावी. बेणे तोडताना डोळ्याच्या वरचा १/३ व खालचा २/३ भाग ठेवून टिपरी तोडावी, वरंब्याच्या बगलेला डोळे येतील याप्रमाणे दोन डोळा टिपरी सरीत ठेवून डोळ्यावर दोन ते अडीच इंच माती लावून कोरडी लागण करून हलक्या प्रवाहाने पाणी द्यावे. नेहमीच्या बेण्याचे गुणन १ : १० ते १ :१२ असे होते म्हणजे १ हेक्टर क्षेत्रावर तयार केलेल्या बेणेमळ्यातून साधारणपणे १० ते १२ हेक्टर लागण होते. परंतु हा बेणेमळा उती संवर्धित रोपांचा वापर करून केल्यास त्याचे १:२० ते १:२५ प्रमाणे गुणन होऊ शकते.

बेणे टिपरी संख्या : हेक्टरी २५ हजार दोन डोळा टिपरीचा वापर करावा. उष्ण बाष्प हवा प्रक्रिया केलेले बेणे हे मूलभूत बेण्यासाठी वापरताना २५ टक्के जास्तीचे बेणे लागण करावी. कारण उष्ण बाष्प हवा प्रक्रियेमुळे कमकुवत बेणे मरण पावतात.

आंतरमशागत : योग्य वेळी बाळ बांधणी, मोठी बांधणी तसेच खुरपणी व एकात्मिक तण व्यवस्थापन करावे. बेणे मळ्यामध्ये रोगग्रस्त (काणी, गवताळ वाढ) बेटे तसेच दुसऱ्या ऊस जातीची बेटे दिसून आल्यास ती तत्काळ काढून नष्ट करावीत. बेणेमळ्यातील उसाचे पाचट काढू नये.

रासायनिक खतांची मात्रा : बेणेमळातील जोमदार वाढीसाठी नेहमीपेक्षा खत मात्रा जास्त द्यावी लागते. लागणीच्या वेळी सरीत ५० किलो नत्र, ७० किलो स्फुरद आणि ७० किलो पालाश द्यावे. प्रति हेक्टरी २५ किलो फेरस सल्फेट, २० किलो झिंक सल्फेट १० किलो आणि मॅग्नेशिअम सल्फेट लागणीच्या वेळी शेणखतात मिसळून द्यावे. लागणीनंतर एक महिन्याने ५० किलो, दोन महिन्यांनंतर १०० किलो तिसऱ्या व चौथ्या महिन्यानंतर ५० किलो नत्र खताची मात्रा द्यावी. मोठ्या बांधणीच्या वेळी १०० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश एकत्रित मिसळून मोठी बांधणी करावी. मोठ्या बांधणीनंतर एक व दोन महिन्यांनी ५० किलो नत्र पाण्यातून किंवा ठिबक सिंचनमधून द्यावे. ऊस बेणे प्लॉट तोडणीपूर्वी राहिलेले १०० किलो नत्र प्रति हेक्टरी द्यावे. एक हेक्टर बेणेमळा क्षेत्रासाठी ५ टन गांडूळ खत, ६०० किलो नत्र, २३० किलो स्फुरद आणि १२० किलो पालाश खत मात्रेची शिफारस आहे.



# महसूल विभागाच्या सर्व सेवा नागरिकांना वेळेत मिळण्यासाठी यंत्रणेने काम करावे -मंत्री बावनकुळे

जालना। प्रतिनिधी

राज्य शासन विविध लोककल्याणकारी लोकाभिमूख योजना राबवून गतिमान आणि पारदर्शक पद्धतीने काम करीत आहे. त्याचप्रमाणे महसूल यंत्रणांनी सर्वसामान्य नागरिकांना महसूल विभागाच्या सर्व सेवांचा लाभ वेळेत मिळावा यासाठी काम करावे, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बानकुळे यांनी दिले. येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी विभाग, भुमि अभिलेख विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री अर्जून खोतकर, बबनराव लोणीकर, संतोष दानवे, नारायण कुचे, हिकमत उढाण, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी सरिता सुत्रावे, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, मुद्रांक शुल्क व नोंदणी विभागाचे सह जिल्हानिबंधक व मुद्रांक अधिकारी रविंद्र मुळे, भुमि अभिलेख विभागाचे जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख एम.पी मगर यांची उपस्थिती होती.




महसूल मंत्री श्री. बावनकुळे यावेळी म्हणाले की, महसूल विभागाचा सर्व नागरिकांशी संबंधीत असून, जनतेच्या जिवाचे व मालमत्तेचे संरक्षण करण्याचे काम महसूल करण्यात येते. प्रत्येक नागरिकांचा महसूल विभागाशी संबंध येत असल्याने महसूल विभागाकडून सर्वसामान्यांना नागरिकांच्या खुप अपेक्षा असतात. त्यानुसार आपणांस आपली कार्यक्षमता वाढवून महसूल विभागाच्या सर्व सेवा नागरिकांना वेळेत देण्याचे नियोजन करुन काम करावे. महसूल विभागामधील अधिकारी, कर्मचारी यांनी लोकाभिमूख कार्य करुन प्रत्येक नागरिकांना लाभ देण्याचे काम करावे. यासाठी महसूल विभागाला आवश्यक असलेले मनुष्यबळ व सुविधा लवकरच उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. जनतेच्या अनेक तक्रारी आहेत, त्यासाठी जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांनी सतर्क राहून काम करण्याची अपेक्षा व्यक्त करतांना ते पुढे म्हणाले की, जिल्हास्तरावरील महसूलासंदर्भात प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याचा संकल्प असून, त्याप्रमाणेच नायब तहसिलदार ते जिल्हाधिकारीस्तरापर्यंत प्रलंबित असलेली महसूली प्रकरणे येत्या तीन महिन्यात निकाली काढण्याचा संकल्प करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. तसेच महसूल अधिकाऱ्यांनी प्रत्येक गावांना भेटी देवून जनतेचे प्रश्न सोडवावेत. तसेच लोकशाही दिनाच्या माध्यमातून जनतेच्या तक्रारीचे निवारण करावे. नाविन्यपूर्ण योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात केलेल्या कामासंदर्भातील माहिती समाजमाध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोहचवावीत यामुळे विभागाबद्दल जनतेमध्ये सकारात्मकता निर्माण होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.महसूल मंत्री म्हणाले की, जनतेच्या सोयीसाठी कालबाह्य झालेले कायदे बदलून त्याऐवजी जनतेला सुलभ सेवा मिळाव्यात यासाठी कायद्याची अंमलबजावणी सुरुवात झाली आहे. तुकडेबंदी नियमामध्ये बदल केल्यामूळे दीड लाख नागरिकांना लाभ मिळाला आहे. त्यासोबतच जनतेला आपल्या मालमत्तेसंदर्भात स्वामित्व मिळावे यादृष्टीने बदल करण्यात आला आहे. तसेच शेत/ पाणंद रस्ता हा शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. प्रत्येकाच्या शेताला रस्ता मिळावा या उद्देशाने शासनाने १२ फुटांचा रस्ता करण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे राज्यातील ५० लाखांहून अधिक नागरिकांना दिलासा मिळणार आहे. तसेच मंत्रालय गाठण्यासाठी सामान्य नागरिकाला होणारा त्रास आणि खर्च टाळण्यासाठी अधिकाऱ्यांचे विकेंद्रीकरण करून, ते अधिकार विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवण्यात येणार आहेत. यामुळे निर्णय प्रक्रिया अधिक वेगवान आणि प्रभावी होण्यास मदत होणार आहे. याशिवाय, शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, महिला आणि सामान्य कुटुंबांसाठी महसूल विभाग प्रभावी आणि सहकार्य करणारा असावा, हे सरकारचं धोरण असल्याचं बावनकुळे यांनी स्पष्ट केलं. महसूल विभाग ही सरकारची पहिली ओळख आहे. जर ही ओळख विश्वासार्ह झाली, तरच सरकारवरचा विश्वास मजबूत राहील, असे ही ते यावेळी म्हणाले.

वाळू वाहतूक व उपश्यामधील काळ्याबाजारामुळे नागरिकांना सुलभपणे वाळू उपलब्ध होत नसल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त आहेत. यावर नियंत्रण आणण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ कार्यवाही करावी. यासंदर्भात मागणीनुसार वाळू उपलब्ध करुन देण्याच्या तत्वावर विचार करण्यात येणार आहे. सर्वसामान्य नागरिकांना वाळू उपलब्ध व्हावी यासाठी सरकारने आता पारदर्शक वाळू धोरण तयार केले आहे. याची अंमलबजावणी काटेकोरपणे आणि स्थानिक पातळीवर प्रभावीपणे करणे ही महसूल अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. वाळू म्हणजे फक्त बांधकाम सामग्री नव्हे, तर जनतेच्या घराची गरज असुन, त्यासाठी त्यांना कोणतीही अडचण निर्माण होवू नये याची दक्षता घ्यावी. महसूल विभागाने कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कार्यपद्धती (एसओपी) निश्चित केली असल्याचे ही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

## गोरक्षनाथ टेकडी येथे किसन बाबा यांची २७ वी पुण्यतिथी कार्यक्रम

### नवनाथ बाबा सह संत महंतांच्या उपस्थितीत सप्तह सांगता | चंद्र सूर्य असे पर्यंत नाथांची किर्ती अजरामर:- पाचपोर महाराज

बीड। प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यतिथी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व गुरुवर्य किसन बाबा महाराज यांची २७ वी पुण्यतिथी आज पहाटे गुरुवर्य किसन बाबा महाराज यांच्या समाधीची विधिवत गुरू पूजन महंत गुरुवर्य शांतीब्रह श्री नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते करण्यात आली. सकाळी १२ वाजता प्रतिवर्षी प्रमाणे विदर्भरत्न रामायणाचार्य ह.भ.प.संजयजी महाराज पाचपोर बुलढाणा यांचे काल्याच्या कीर्तनाने झाली आहे.



या कीर्तनसाथ नानाभाऊ लांडे महाराज, व लक्ष्मीकांत म कदम मृदंगसाथ धनंजय महाराज बोंगाने , अनिकेत महाराज लांडे यांची कीर्तनात मृदुंग साथ दिली. अभंग विवेचन करताना पाचपोर महाराज यांनी सांगितले की नाथांनी आपल आयुष्य गोर गरिबांच्या हितासाठी अर्पण केले गोर गरिबांच्या जीवनात सुखाचे दिवस यावेत म्हणून नाथांनी आयुष्य घातले आदिनाथ, मच्छिंद्रनाथ गोरक्षनाथ, साधू महाराज, गुरुवर्य किसनबाबा महाराज, शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी आपल आयुष्य जनसामान्य माणसासाठी घातले. म्हणून जो पर्यंत या पृथ्वीवर चंद्र सूर्य आहे तो पर्यंत नाथांची किर्ती अजरामर होत हा नाथाचा लोककल्याणाचा वारसा गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज हे चालवत आहेत असे प्रतिपादन पाचपोर महाराज यांनी केले. टाळकरी, वारकरी, यांच्या राजकीय बीड जिल्ह्यातील माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर,खासदार बजरंग बाप्पा सोनवणे,सह भाविक भक्तांनी प्रचंड गर्दी मध्ये गुरुवर्य किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यतिथी निम्मित अखंड हरिनाम सप्ताह व पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न झाला. संपूर्ण बीड जिल्ह्यातील दोन ते अडीच लाख भाविक भक्तांनाची काल्याच्या कीर्तनाचा लाभ घेतला. महाप्रसादाच्या महापगती बसवण्या आल्या परिसरातील टॅक्टर पिका च्या साह्याने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दिड एकर वॉटरप्रूप मंडप, जुना सीमेट सभामंडप, भरून बाहेरील परिसरात बसून भाविक भक्तांनी कीर्तनाला उपस्थिती लावली जेथे जागा भेटेल तेथे भाविक भक्त उभे होते.

## तलवारी बाळगणाऱ्या दोघांना अटक



जालना। प्रतिनिधी

परतुर शहरात अवैधरित्या धारदार तलवारी व शस्त्र बाळगणा-या इसमांची माहिती काढून त्यावर कारवाई करण्याचे आदेश मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल यांनी दिले होते त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री.एस.वी. भागवत यांनी पोलीस ठाणे परतुर येथील अधिकारी अंमलदार यांचे अवैधरित्या धारदार तलवारी व शस्त्र बाळगणा-या इसमांवर कारवाई करण्यासाठी पथके नेमलेले होते. ८ ऑगस्ट रोजी पोलीस निरीक्षक श्री.भागवत यांना माहिती मिळाली की, परतुर पारडगाव रस्त्याच्या बाजुला व रेल्वे स्टेशन समोर एका घरामध्ये काही अवैधरित्या धारधार तलवारी बाळगत आहेत असे खात्रीशिर माहिती मिळाली होती. त्यावरुन श्री. भागवत यांनी पोलीस ठाणे परतुचे दोन पथक अवैधरित्या धारधार तलवारी बाळगणा-या इसमांना पकडण्यासाठी सुचना देऊन आदेशीत केले होते.

पथकातील अधिकारी अंमलदार यांनी परतुर-पारडगाव रोडवरील घरामध्ये जाऊन पाहणी केली असता आरोपी संतोष लक्ष्मण काळे वय ३२ वर्ष रा. परतुर-पारडगाव रोड, परतुर व एक महिला असे दोघे व अवैधरित्या ३ धारदार तलवारी बाळगतांना मिळुन आले आहे. तसेच रेल्वे स्टेशन समोर एका पत्र्याच्या शेडमध्ये एक आरोपी गिरधारी दादाराव पवार वय ४३ रा.रेल्वे स्टेशन समोर, परतुर हा (०१) अवैधरित्या धारदार तलवार बाळगतांना मिळुन आला आहे. सदर तिन्ही आरोपीतांविरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बसंल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परतुरचे पोलीस निरीक्षक श्री.एस.बी. भागवत, पोउपनि श्री. अमोल रावते, अंमलदार धर्मा शिंदे, किरण मोरे, गजानन राठोड, विजय जाधव, नरेंद्र चव्हाण, दशरथ गोपनवाड, पवनकुमार धापसे महिला अंमलदार कल्पाना धडे आय.टी. सेल अंमलदार सागर बाविस्कर यांनी केलेली आहे.



जालना : राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे हे जिल्हास्तरीय महसूल सप्ताहाचा सांगता समारोह साठी अंबड इथे आले असता त्यांचे स्वागत तेली समाजाच्या वतीने करण्यात आले यावेळी सर्व तेली समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते

## गजानन नागरी सहकारी बँक नेकनूर शाखेचा ग्राहक मेळावा उत्साहात संपन्न

नेकनूर । प्रतिनिधी

श्री गजानन नागरी सहकारी बँक लि., बीड - नेकनूर शाखेच्या वतीने आयोजित ग्राहक मेळावा नुकताच उत्साहात संपन्न झाला. बँक व ग्राहक यांच्यातील विश्वासाचे बंध अधिक घट्ट करणारा हा मेळावा, पारदर्शक व सेवा प्रधान बँकिंगच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अॅड. दत्तात्रय डोईफोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून अॅड. राजेश तांगडे, संचालक अर्जुन बहिरवाळ, तसेच स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य सेवानंद कदम, पांडुरंग होमकर, जफर काझी, कल्याण भटे, अर्जुन सानप आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे व्यवस्थापक विलास कुंभेफळकर यांनी केले. बँकेचे शाखा व्यवस्थापक रवींद्र कुलकर्णी व कर्मचारी अमोल डोईफोडे, गणेश आनेराव, गणेश पोपळे, राहुल चौधरी, सोमनाथ शेळके




यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व व्यवस्थापन केले. या वेळी बँकेच्या विविध सेवा व योजनांची माहिती ग्राहकांना देण्यात आली. ठेवी, विविध कर्ज योजना, ठेवीवरील विमा सुरक्षा योजना, तसेच नुकतीच सुरू करण्यात आलेली केशर कर्ज योजना याबाबत उपयुक्त माहिती ग्राहकांसमोर मांडण्यात आली. कार्यक्रमात स्थानिक मान्यवर, डॉक्टर, व्यापारी, सराफ संघटनेचे पदाधिकारी व व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. डॉ. शिंदे, डॉ. वाणी, डॉ. खोमणे, डॉ. गणेश, डॉ. हाडे, डॉ. सोंडगे यांसह अनेक प्रतिष्ठित नागरिकांनी बँकेच्या कार्यपद्धतीचे व सेवाभावाचे मनःपूर्वक कौतुक केले. प्रमुख पाहुणे संचालक अर्जुन बहिरवाळ यांनी मुकादम व्यवसायातील अडचणी आणि बँकेच्या सहकार्याचे महत्त्व पटवून दिले. अँड. राजेश तांगडे यांनी ग्राहकांचा वाढता विश्वास, बँकेची पारदर्शकता आणि तांत्रिक प्रगतीचा उल्लेख करून बँकेच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष अँड. डोईफोडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बँकेच्या यशस्वी वाटचालीत ग्राहक, कर्मचारी, संचालक मंडळ व स्थानिक समुदायाच्या समन्वयाचे योगदान महत्वाचे असल्याचे सांगितले. १९९४ मध्ये स्व. केशरबाई क्षीरसागर ऊर्फ काकूंनी स्थापन केलेली ही बँक, आज ग्रामीण महाराष्ट्रातील आर्थिक परिवर्तनाचे प्रतीक बनली आहे. स्वावलंबी शेतकरी, व्यापारी आणि नागरिक घडवण्याच्या ध्येयाने सुरू झालेल्या या संस्थेने विश्वासार्हतेचा ठसा उमटवत विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागात आर्थिक सक्षमतेचे नवे पर्व लिहिले आहे. ग्राहकाभिमुख सेवा, डिजिटल बँकिंग, एटीएम, मोबाईल सेवा, व्यवसाय, शेती व शिक्षणासाठी सुलभ कर्ज योजना, ठेवी सुरक्षित ठेवण्यासाठी विमा संरक्षण, आपल्या बँकेच्या एटीएम, मोबाईल बँकिंग, विमा संरक्षण आणि विविध कर्ज योजनांचा लाभ घ्यावा. आधुनिक तंत्रज्ञानासोबत बँकेचा सेवाभाव जोडला जाऊन तुमच्या आर्थिक प्रगतीला नवे बळ मिळू शकते.

## जिल्हाधिकाऱ्यांनी नोंदणी करुन केला बालाघाट हाफ मॅरेथॉन पोर्टलचा शुभारंभ

### ९ नोव्हेंबरला भव्य स्पर्धा; बीडचा फिटनेस स्पिरिट पुन्हा रंगणार

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील आरोग्यवर्धक उपक्रमांच्या यशस्वी वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण पर्व ठरलेल्या बालाघाट हाफ मॅरेथॉन स्पर्धेच्या चौथ्या पर्वाची तयारी जोमात सुरू झाली आहे. ९ नोव्हेंबरला बालाघाट हाफ मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले असून शुक्रवारी (दि.८) जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते या स्पर्धेच्या ऑनलाईन नोंदणी पोर्टलचा शुभारंभ जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला. शुभारंभानंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः नोंदणी केली असून, ते स्वतः या मॅरेथॉनमध्ये धावणार आहेत.



बालाघाट हाफ मॅरेथॉन ही सातारा हिल मॅरेथॉननंतर राज्यातील कठीण मॅरेथॉनपैकी एक मानली जाते. त्यामुळे राज्यभरातील धावपटूंमध्ये या स्पर्धेची विशेष उत्सुकता असते. आकर्षक बक्षिसे, स्पर्धेतील गटांची विविधता आणि निसर्गरम्य भागातील धावण्याचा अनुभव यामुळे ही स्पर्धा विशेष ठरते. योगा ग्रुपने गेल्या काही वर्षांत बीडमध्ये सायकलिंग, रनिंगसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून आरोग्यप्रेमी तरुणांची चळवळ उभी केली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करणाऱ्या अनेक धावपटूंना घडवण्यात या ग्रुपचा मोलाचा वाटा आहे. यंदा ९ नोव्हेंबर रोजी बालाघाट हाफ मॅरेथॉनचे आयोजन केले आहे. याच्या ऑलनाईन नोंदणी पोर्टलचा शुभारंभ जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते जिल्हाधिकारी यांच्या दालनात करण्यात आला. या मॅरेथॉनमध्ये २१ किमी, १० किमी आणि ५ किमी अशा तीन गटांमध्ये स्पर्धा होणार आहे. स्पर्धेसाठी ऑनलाईन नोंदणी आजपासून सुरू झाली असून दरवर्षीप्रमाणे यंदाही २००० ते २५०० स्पर्धक सहभागी होतील, असा आयोजकांचा अंदाज आहे.या कार्यक्रमास अनिल थोरात, विशाल सुस्कर, कल्याण कुलकर्णी, सुदर्शन हेरकर, राजू माने, गणेश वाघ, संदीप येवले, प्रशांत पौळ, ज्ञानेश्वर राऊत, लक्ष्मीकांत महाजन, दीपक ससाणे, सुहास देशपांडे, प्रकाश दामा, बंडू आगलावे, विवेक सोमवंशी, सुदर्शन शिंदे आदींसह अनेक सदस्य उपस्थित होते. उपस्थितांचे आभार नितीन आघाव यांनी मानले. बालाघाट हाफ मॅरेथॉन पोर्टलचा शुभारंभ केल्यानंतर स्पर्धेस हिरवा झेंडा दाखवण्याचाही मान जिल्हाधिकाऱ्यांनी स्वीकारला आहे. बीडसारख्या जिल्ह्यात अशी स्पर्धा होणे ही गौरवाची बाब आहे. योगा ग्रुपचे काम कौतुकास्पद असून यामुळे बीडची ओळख वाढत आहे असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले. ९ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या बालाघाट हाफ मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी आजपासून ऑनलाईन नोंदणी सुरू झाली आहे. २१ किमी, १० किमी आणि ५ किमी गटांमध्ये होणाऱ्या या स्पर्धेमध्ये राज्यभरातील धावपटूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा,असे आवाहन योगा ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.

### हरवले आहे

कु.सिमरन हासन शेख या नावाने असलेले इ. १२ वी.पासचे ओरजनल शालेय मार्कसिट,टि.सी.व अन्य महत्त्वाची कागदपत्रे असलेली फाईल कडा ते अहिल्यानगर (अ.नगर ) प्रवासात हरवली आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

**संपर्क**
**७०३००३५२१८**

## मंडल आयोग दिनानिमित्त मंडल स्तंभास अभिवादन



जालना

मंडल आयोग लागू दिनानिमित्त अंबड तालुक्यातील दोदडगाव येथील मंडल स्तंभास अभिवादन करण्यात आले. यावेळी मंडल स्तंभाचे निर्माते व माजी आमदार डॉ. नारायणराव मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात समता परिषदेचे राज्य सरचिटणीस प्रा. सत्संग मुंडे, रवींद्र खरात, अॅड. विजय देविदास खटके, सुघोष मुंडे, सरपंच बंडूभाऊ मुंडे, सुभाष चाटे, हरिभाऊ विटोरे, शरद राठोड, दिनेश गाजरे, रामजी खुरंगे, श्री. निर्मळ, नामदेव घुगे, शेख बडे भाई, प्रा. लहू दरगुडे, डॉ. सोमीनाथ खाडे, चत्रभुज मुंडे, महारुद्र केकान, शिंगारे मामा, संतोष साबळे, वामन गिते, अमोल ढाकणे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात प्रा. सत्संग मुंडे यांनी मंडल आयोगासाठीच्या चळवळींची आठवण करून दिली. वक्त्यांनी जातनिहाय जनगणनेचे महत्त्व अधोरेखित केले. नागरिकांनी जय ओबीसी जय संविधान, एकच पर्व ओबीसी अशा घोषणा देत सामाजिक न्यायासाठी एकजुटीचा निर्धार व्यक्त केला.



# धारूर पालिकेत घनकचरा नियोजनाचे तीन तेरा

## निवडणूका नसल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांना वाली नसल्याचा परिणाम

किल्ले धारूर । प्रतिनिधी

**धारूर नगरपालिकेचे नियोजन अत्यंत ढेपाळलेले असून शहरामध्ये रस्त्याची दयनीय अवस्था आहे तर स्वच्छतेचे तीनतेरा वाजले आहेत. नगरपालिकेविरुद्ध कोणताही राजकीय नेता किंवा पक्ष पुढे आल्याचे दिसत नाही. निवडणूका लागल्यानंतर पावसाळ्यातील छत्र्याप्रमाणे राजकीय पक्ष आणि नेते उगवतात. मात्र नागरिकांच्या समस्यांबाबत अनेकवेळा दुर्लक्ष दिसून येते. शहरात घनकचऱ्याचे नियोजन व्यवस्थित नसल्याने नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असून आरोग्य देखील यामुळे धोक्यात आले आहे.**

धारूर शहरातील कचऱ्याचे नियोजन कोर्टासमोरील जागेमध्ये करण्यात आलेले असून तसेच अंबाचोंडी देवीकडे जाण्याच्या रोल लगत असून घनकचऱ्याच्या बाजूला गर्ल्स हॉस्टेल असून तसेच समोरील बाजूस आयटीआय कॉलेज असून तसेच राम मंदिर देखील या ठिकाणी असून व कोर्टाच्या एकदम समोर घनकचरा साठवण्याचे ठिकाण आहे परंतु गेल्या अनेक दिवसापासून या घनकचऱ्याचे नियोजन नसल्यामुळे या घनकचऱ्याची दुर्गंधी लांब पर्यंत येत आहे तसेच सकाळी फिरण्याकरता व सायंकाळच्या टायमाला घेण्याकरता अनेक लोक या रस्त्यावर येत जात असतात तसेच हवेमुळे हा कचरा कंपाऊंडच्या बाहेर देखील ओढून येतो येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांच्या अंगावर येतो यामुळे नागरिकांच्या आरोग्यास मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे तसेच घनकचर्याच्या कंपाउंड चे गीत नेहमी उघडे असल्यामुळे आत मध्ये मुके जनावरे जाऊन प्लास्टिकची सेवन करतात यामुळे या मुख्य जनावरांच्या देखील जीवितास धोका निर्माण झालेला आहे तरी नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या घनकचऱ्याचे योग्य ते नियोजन करावे अशी मागणी धारूर शहरातील नागरिकांकडून मोठ्या प्रमाणामध्ये केली जात आहे. पालिकेच्या निवडणूका न झाल्यामुळे कर्मचारीराज पालिकेत आहे. त्यामुळे मुलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. पदाधिकारी नसल्यामुळे अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची मनमानी सुरू असल्याचे दिसत आहे.

# सदोष मनुष्यववधाच्या गुन्ह्यात सहा आरोपींची निर्दोष मुक्तता

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील आहेरवडगाव येथे २०१८ मध्ये झालेल्या मयत विलास गंगाधर देशमुख यांच्या सदोष मनुष्यवधाच्या बहुचर्चित प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांनी सर्व सहा आरोपींना निर्दोष मुक्तता दिली.



२२ मार्च २०१८ रोजी विकास विलासराव देशमुख यांनी बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. ९०/२०१८ कलम ३०४, १४७, ३२३, ५०४ भा.दं.वि. अंतर्गत तक्रार दाखल केली होती. शेतीच्या वादातून झालेल्या मारहाणीत मृत्यू झाल्याचा आरोप रावसाहेब केशव मोरे, अशोक रावसाहेब मोरे, बाबुसाहेब मोरे, इंदुबाई रावसाहेब मोरे, कौशल्याबाई भास्कर शिंदे आणि मिनाबाई अशोक शिंदे यांच्यावर होता. तपासात १७ प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदवले गेले. मात्र बचाव पक्षाच्या भक्कम युक्तिवादावर विश्वास ठेवत न्यायालयाने सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केले. आरोपींच्या वतीने अॅड. शशिकांत सावंत यांनी बाजू मांडली. त्यांना अॅड.अभिषेक बहिर, अॅड. विशाल कदम, अॅड. माऊली डाके, अॅड. प्रदीप दराडे, अॅड. विजय डोके, अॅड. मुकुंद लोणकर, अॅड.धरणे आणि अॅड. अमोल तिडके यांनी सहकार्य केले.

# आजपासुन पांढरी- वांढरे वस्ती येथे अखंड हरिनाम सप्ताह

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पांढरी वांढरेवस्ती येथे दि.१० ते १७ आगस्ट २०२५ या कालावधीत

ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळा होत आहे.यंदाचे हे चौथे वर्षे आहे.श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचा ७५० वा.जन्मोत्सव सोहळा वांढरे वस्ती पांढरी येथे होत आहे. सालाबादप्रमाणे याही वर्षी श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव तथा श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचा ७५० वा. जन्मोत्सव सोहळानिमित्त पांढरी (वांढरे वस्ती) या परिसरातील सर्व भाविकांच्या सहकार्याने अखंड हरिनाम सप्ताहाचे व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केलेले आहे.पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी या भव्य दिव्य सोहळ्याचा लाभ घ्यावा ह.भ. प.प्रशांत महाराज भोगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ह.भ. प.धोंडीबाप्पु वांढरे, ह.भ.प काशीनाथ महाराज शेंबडे, ह.भ.प.सुरज महाराज भगत (देसुर) हे व्यासपीठ चालक म्हणून काम पाहत आहेत. ह.भ.प.नानासाहेब महाराज भोगाडे, ह.भ.प.विभीषण महाराज शिंदे व इतर भाविक मंडळी हे नामजप करणार आहेत.सप्ताहात काकडा, ज्ञानेश्वरी पान ३ वर

# आदिवासी भटक्या विमुक्त लाडक्या बहीणी बरोबर आ. सुरेश धस यांनी साजरे केले रक्षाबंधन !

आष्टी । प्रतिनिधी

हींदु धर्मियांच्या सना पैकी एक पवित्र असा बहीण भावाच्या नाते संबंध दुयगुनित करणारा हा सन आमदार सुरेश आण्णा धस हे नेहमीच हा सन गोरं गरीब भटक्या विमुक्त आदिवासी महीला भगिनी बरोबर लाडक्या बहीणी सोबत रक्षाबंधन साजरा करतात आज देखील त्यांच्या अद्वोतचंद्र या निवास स्थानी भल्या सकाळपासून महीला भगिनी राख्या घेऊन आपले नेते नेहमीच सुख सुखांत मदतीचा हात देणारे गोर गरीबांचे कैवारी सुरेश अण्णा धस यांना राखी बांधण्याची गर्दी केली होती येणाऱ्या प्रत्येक लाडक्या बहीनीचां आमदार सुरेश आण्णा धस यांनी साडी सोळी देऊन सन्मान केला. यावेळी मतदार संघातील भटक्या विमुक्त आदिवासी महीला बंधु भगिनी उपस्थित होते. यावेळी नगरसेवक कार्यकर्ते युवा कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी आज आदीवासी दींन असल्याने बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पुजन करून आदिवासी बांधवांना शुभेच्छा दिल्या.



# दिल्लीत केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत होणार एपीजे अब्दुल कलाम युथ अवॉर्ड कार्यक्रम

## प्रदेश प्रभारी सलीम जहाँगीर यांची माहिती; ५०० अल्पसंख्यांक व्यवसायिकांचा सहभाग

बीड । प्रतिनिधी

देशाचे नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील ''कलाम को सलाम'' मोहिमेचा एक भाग म्हणून, अल्पसंख्याक मोर्चा अल्पसंख्याक समुदायातील प्रतिभावान व्यावसायिक तरुणांना ''डॉ. कलाम स्टार्टअप युथ अवॉर्ड २.० '' पुरस्कार देऊन सन्मानित करणार आहे. दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी दिल्लीत हा कार्यक्रम होणार आहे. भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील अल्पसंख्यांक समाजातील व्यावसायिकांची नोंदणी करण्यात आली असून त्यापैकी महाराष्ट्रातील ५०० अल्पसंख्यांक व्यावसायिकांनी ऑनलाइन नोंदणी करून यात सहभाग घेतल्याची माहिती भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री तथा अभियानाचे प्रदेश प्रभारी सलीम जहाँगीर यांनी दिली.



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री पंकजाताई मुंडे, डॉ. प्रितमताई मुंडे , राज्य अल्पसंख्यांक मोर्चाचे अध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या नेतृत्वाखाली एपीजे अब्दुल कलाम युथ अवॉर्ड समारोह प्रदेश प्रभारी सलीम जहाँगीर यांनी राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील व्यावसायिकांची ऑनलाईन नोंदणी करून घेतली आहे. ''मिसाइल मॅन ऑफ इंडिया ''म्हणून ओळखले जाणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या पान ३ वर

# भागवत केकान यांचे शैक्षणिक कार्य कौतुकास्पद - मा.आ.प्रा.सुनील धांडे

शिरूर कासार । प्रतिनिधी

तागडगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक भागवत केकाण हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.त्यांच्या सेवापुर्तीचा कार्यक्रम तागडगाव येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यावेळी मा.आमदार सुनील धांडे यांनी भागवत केकान यांचे शैक्षणिक कार्य कौतुकास्पद असल्याचे आपल्या अध्यक्षीय भाषणातून म्हटले आहे. यावेळी व्यासपीठावर प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे,



शुभाशीर्वाद देण्यासाठी अतुल महाराज शास्त्री, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर केकान, सेवानिवृत्त कार्यकारी अभियता मिठूशेठ सानप,सेवानिवृत्त मुख्याध्यापक सोपान शेकडे, मा.जिल्हा परिषद आश्रुबा खरमाटे, वैजनाथ मिसाळ,मा.उपसभापती जालिंदर सानप, मा. प. स. सदस्य मंगलताई सानप,

वसंत सानप, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सोपान शेकडे,उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना मा. आमदार सुनील धांडे यांनी सांगितले की निवृत्ती हा एक नवीन प्रवास सुरू करण्याचा आणि तुमच्या आवडीच्या गोष्टींसाठी वेळ काढण्याचा क्षण आहे.शिक्षकांनी केलेले कार्य खूप मोठे आहे आणि त्यांच्या अनुभवांचा आणि ज्ञानाचा समाजाला नेहमीच उपयोग होईल असे सांगून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाला ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी जमीर शेख, पान ३ वर

# आ.नमिता मुंदडा यांचा पोलीस बांधवांसोबत रक्षाबंधन कार्यक्रम



युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील पोलीस स्टेशन मध्ये आज रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने आमदार नमिताताई मुंदडा यांच्या वतीने पोलीस बांधवांना राख्या बांधुन हा सण साजरा करण्यात आला.

पोलीस कर्मचारी आपले कर्तव्य बजावत असताना त्यांना त्यांच्या स्वत:च्या घरी रक्षाबंधनासाठी जाता येत नाही, तेच आपल्या भगिनींचे खरे रक्षक आहेत. व त्यांच्यामुळेच कायदा व सुव्यवस्था अबाधित आहे ,त्यामुळे त्यांना राख्या बांधणे योग्य आहे, व तेच आपले रखवालदार असून समाज रक्षणाची खरी जबाबदारी पोलीस बांधवच पार पाडत असतात असे आमदार नमितताई मुंदडा यांनी म्हटले आहे.याप्रसंगी पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक भारत बर्डे सर्व पोलीस बंधू उपस्थित होते.नमितताईं मुंदडा यांच्या वतीने आशा वर्कर सुनीता पान ३ वर



# जागतिक आदिवासी दिनानिमित्त वाल्मिकी ऋषी व बिरसा मुंडा यांना अभिवादन!

वडवणी । प्रतिनिधी

जागतिक आदिवासी दिनानिमित्त आज वडवणी शहरामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महर्षी वाल्मिकी ऋषी व देशातील वीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली यावेळी बोलताना ओबीसी नेते प्रा. वैजेनाथ शिंदे म्हणाले की, ज्या ज्या वेळी महादेव कोळी समाजाला अडचणी येथील वेळी सर्व वडवणी पान ३ वर

# महिलांनी आत्मनिर्भर बनण्यासाठी व्यवसायात उतरावे -किरण कोरे

दिंद्रुड । प्रतिनिधी

महिलांनी आत्मनिर्भर बनण्यासाठी ब्युटी पार्लर व्यवसायात उतरणे आवश्यक आहे. आपली आर्थिक बाजू मजबूत करण्यासाठी व महिलांच्या सानिध्यात राहुन महिला सक्षमीकरण करण्यासाठी पुढे येणे आवश्यक असल्याचे मत सुप्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट किरण कोरे व आयोजख श्वेता आंभोरे यांनी व्यक्त केले आहे. माजलगाव येथील व्यंकटेश हॉटेलच्या हॉलमध्ये ब्युटी पार्लर व्यवसायिकांच्या भव्य सेमिनारचे आयोजन गुरुवारी करण्यात आले होते त्याप्रसंगी ते बोलत होते.



व्यवसायात महिलांनी गेल्या काही वर्षांपासून प्रगती साधली आहे. ब्युटी पार्लर हा महिलांसाठी सर्वात चांगला पर्याय म्हणून पुढे आला आहे. महिलांनी आत्मनिर्भर बनण्यासाठी या व्यवसायात उतरणे गरजेचे असून आपली आर्थिक बाजू मजबूत करण्यासाठी महिलांनी पुढे येणे आवश्यक असल्याचे मत या प्रसंगी किरण कोरे व श्वैता आंभोरे यांनी केले.किरण कोरे हे जगप्रसिद्ध प्रसिद्ध मराठी मेकअप आर्टिस्ट आणि लावणी कलाकार आहेत. ते मेकअप आणि हेअरस्टाइलिंगमध्ये तज्ञ आहेत, अनेक मराठी चित्रपटांमध्ये वेशभूषा व मेक अप चे काम केले आहे. त्यांना ''लावणी सम्राट'' म्हणूनही ओळखले जाते. व्यंकटेश हॉटेलमध्ये आयोजित कार्यक्रमात माजलगाव तालुक्यातील महिलांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन रेणुका मुसळे आणि राजश्री भोसले तसेच वैजनाथ पवार यांनी सहकार्य केले.

# श्री क्षेत्र श्रीरामगड माळापुरी फाटा येथे पंचकुंडिय गायत्रीयज्ञ

बीड प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या माळापुरी फाटा येथील श्रीराम संस्थांवर अ.वि. गायत्री परिवार हरिद्वार शाखा बीड यांच्या वतीने व गायत्री परिवाराचे जिल्हा समन्वयक ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे यांच्या मार्गदर्शनाखाली प.पु.गुरुदेव यांच्या कार्याचा प्रचार आणि प्रसार अ.वि.गायत्री परिवार बीड शाखेच्या वतीने काल दिनांक ३/८/२५ रविवारी गायत्री पंचकुंडी यज्ञ संपन्न झाला .या वेळी सकाळी मंदिर परिसरामध्ये हरिनामाच्या गजरात व पावले खेळत डोक्यावर कलश घेऊन दिंडी मिरवणूक काढण्यात आली होती .मिरवणुकीनंतर पंचकुंडी



यज्ञाला सुरुवात झाली. भरपूर पाऊस पडावा, शेतकरी राजा आनंदी व्हावा,धनधान्य व सुख-समृद्धी यावी तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटावा यासाठी वरूण राजाला विनंती करून त्यांच्या नावे पर्जन्यवृष्टी साठी आहुती टाकण्यात आल्या. यावेळी माळापुरी, बीड ,पेडगाव, आदि परिसरातील भावीकभक्त माता भगिनी, बालगोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते .बीड चे व्यापारी बंधु ही मोठ्या संख्येने हजर होते. या यज्ञाचे पौरोहित्य मोहन महाराज खरमाटे यांनी केले . यज्ञाचे मुख्य यजमान श्रीराम गड संस्थांचे ह.भ.प.गोकुळ शास्त्री तुपे व सहपरिवार हे होते. हा पंचकुंडी यज्ञ यशस्वी करण्यासाठी ह.भ.प. तुकाराम महाराज तुपे , श्रीहरी तुपे सर, मुकुंद भुतपल्ले , वाल्मीक चाटे , विलास लेंभे , महादेव (नाना,) साळुंके , हनुमानदास बियाणी, यांनी विशेष परिश्रम घेतले व शिवसेना बीड जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमानंतर यज्ञाची पूर्णाहुती झाल्यानंतर बीडच्या मधुर गायिका शालिनीताई जाधव यांचा भजन व गवळणी गायनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाने श्रीराम गड संस्थांन वर भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# मांजरगाव प्रकरण धार्मिक वाद नसून दोन शाळकरी मुलांच्या वादातून घटना, खोटी आफवा पसरण्याविरुद्ध कारवाई करणार

जालना । प्रतिनिधी

**बदनापूर तालुक्यातील मांजरगाव येथे ८ ऑगस्ट रोजी संध्याकाळी झालेल्या दोन गटांतील वादामुळे गावात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. घटनेनंतर सोशल मीडियावर ''धार्मिक स्थळावरून दोन समाजात वाद'' अशी बातमी वाऱ्यासारखी पसरली. मात्र, ही माहिती पूर्णपणे चुकीची असून हा वाद फक्त दोन लहान शाळकरी मुलांच्या भांडणातून उफाळल्याचे पोलीस निरीक्षक मछिंद्र सुरवसे यांनी स्पष्ट केले आहे.**

घटना कळताच बदनापूर पोलिसांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांना पाहताच जमलेला जमाव पळून गेला. या वेळी २० ते २५ मोटारसायकली घटनास्थळी सोडून दिल्याने त्या पोलिसांनी जप्त केल्या. दोन्ही गटांकडून तक्रारी दाखल करण्यात आल्या असून, या शाळकरी लहान मुलांच्या भांडणांमध्ये पाच जण जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पोलीस निरीक्षक सुरवसे म्हणाले,

''धार्मिक वादाचा कुठलाही संबंध नाही. ही घटना दोन शाळकरी मुलांच्या भांडणातून घडली आहे. चुकीच्या बातम्या सोशल मीडियावर पसरवल्या जात आहेत. कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, कोणालाही वाचवले जाणार नाही.''याप्रकरणी पोलीस ठाण्यामध्ये काही लोकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. रात्री उशिरा हल्लेखोरांपैकी चार जण पोलिसांनी ताब्यात घेतले असून, उर्वरित आरोपींचा शोध व्हिडीओ फुटेजच्या आधारे सुरू आहे. यापूर्वी ८ ऑगस्ट रोजीच धार्मिक स्थळावरील भोंग्याचा वाद पोलीस निरीक्षक सुरवसे यांनी शांततेने मिटवला होता. विशेष म्हणजे, सोशल मीडियावरील अफवांना छेद देत पोलिसांनी गावात पुन्हा शांतता प्रस्थापित करण्यात यश मिळवले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बारामतीत पुन्हा विमानाचा अपघात!

## टायर निखळल्याने टॅक्सीवेवरून गवतात घुसलं, मोठी दुर्घटना टळली

**बारामती । प्रतिनिधी**

येथील रेड बर्ड एव्हिएशन खाजगी विमान प्रशिक्षण संस्थेच्या शिकाऊ विमानाला आज (९ ऑगस्ट) सकाळी पावणे आठच्या सुमारास अपघात झाला. प्रशिक्षणार्थी पायलट विवेक यादव (वय २४, मुंबई) विमान उडवत असताना पुढील टायरमध्ये तांत्रिक बिघाड झाला. टायर वाकडे होऊन निखळल्याने विमान टॅक्सीवेवरून बाजूच्या गवतात घुसले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, परंतु विमानाच्या पंख्याचे आणि चाकाजवळील भागाचे नुकसान झाले आहे.




नेमकं काय घडलं?

विवेक यादव यांनी नेहमीप्रमाणे प्रशिक्षणासाठी उड्डाण घेतले होते. लँडिंगदरम्यान पुढील टायरमध्ये बिघाड झाल्याचे लक्षात येताच त्यांनी आपत्कालीन लँडिंगचा प्रयत्न केला. मात्र, टायर निखळल्याने विमान धावपट्टी सोडून गवतात गेले. घटनास्थळी रेड बर्डच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने विमान बाजूला घेऊन दुरुस्तीचे काम सुरू केले. रेड बर्डकडून या प्रकरणी कोणतेही अधिकृत निवेदन जारी करण्यात आलेले नाही.

यापूर्वीही झाला होता अपघात

रेड बर्ड एव्हिएशनच्या विमानांना यापूर्वीही बारामतीत अपघात झाले आहेत. ऑक्टोबर २०२३ मध्ये चार दिवसांच्या अंतराने दोन अपघात घडले होते. त्यामुळे डायरेक्टोरेट जनरल ऑफ सिव्हिल एव्हिएशन (ऊ्रऊ-) ने रेड बर्डच्या सर्व तळांवरील प्रशिक्षण कार्यवाहीवर निर्बंध घातले होते.

यामध्ये तांत्रिक बिघाड आणि देखभाल प्रक्रियेतील त्रुटी आढळल्या होत्या. काही महिन्यांपूर्वी हे निर्बंध उठल्यानंतर प्रशिक्षण पुन्हा सुरू झाले, परंतु आजच्या घटनेने पुन्हा सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

दरम्यान, हा अपघात विमानतळाजवळ घडल्याने मोठी दुर्घटना टळली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. जर विमान एखाद्या निवासी भागात, शाळेत किंवा चखऊ मधील कंपनीवर कोसळले असते, तर मोठी हानी होऊ शकली असती.

## जुन्नरमध्ये महामार्गालगतच्या विनापरवाना हॉटेल्स, शिळ्या अन्नाची तक्रार; तपासणीची मागणी

**जुन्नर । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील अनेक गावांत व रस्त्यालगत अनेक छोटी मोठी हॉटेल्स व ढाबे विनापरवाना चालत आहेत. अशा हॉटेल व ढाब्यांमधील अन्न खाऊन विषबाधा झाल्यास याला जबाबदार कोण? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. त्यासाठी येथील पदार्थांची तपासणी करण्याची मागणी जोर धरत आहे.

जुन्नर तालुक्यात मोठी लोकसंख्या असणारी अनेक गावे असून यातील बरीचशी गावे महामार्गालगत व मुख्यमार्गालगत आहेत. यामुळेच हॉटेल व ढाबा व्यवसाय चालू झाले आहेत. हा व्यवसाय चालू करण्यासाठी अन्न-औषध प्रशासन विभागाकडून परवाना घेणे आवश्यक असते. परंतु याची पर्वा न करता हे व्यवसाय राजरोसपणे चालू असल्याचे दिसून येते. यातील काही हॉटेल व ढाबा व्यावसायिकांकडे परवाना आहे. मात्र, तो परवाना नूतनीकरण न केल्याचे दिसते. बहुंताश हॉटेल व ढाब्यांवर कमालीची अस्वच्छता असून शिळे अन्न दिले जात असल्याची प्रवासी वर्गाची तक्रार आहे. येथील पाणी पिण्यायोग्य आहे का नाही? याबाबतही संभ्रम आहे. सगळीकडे पावसाळी दिवस चालू असून याच दिवसात मलेरिया, कावीळ, टॉयफॉईड, डायरिया यासारख्या रोगांचा प्रादुर्भाव असतो.

ज्या जागेत व्यवसाय करायचा, अशी जागा बिनशेती असावी असा नियम आहे. मात्र बरेचशी हॉटेल्स व ढाबे बिनशेती नसलेल्या जागेतच चालू आहेत. त्यामुळे सरकारचा महसूल बुडत आहे. तहसीलदार कार्यालयामार्फत अशा जागेत चालणाऱ्या व्यवसायांची तपासणी होणे आवश्यक आहे.

अन्न-औषध प्रशासन विभागामार्फत विना परवाना चालणाऱ्या हॉटल्स व ढाब्यांमधील अन्नाची व पाण्याची तपासणी होणे आवश्यक आहे. प्रामुख्याने एस.टी स्थानकात असणाऱ्या कॅन्टीनमध्ये तपासणी होणे अत्यंत गरजेचे आहे, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

## फिरती लोकअदालतीतून झटपट न्याय ; पुणे जिल्ह्यातील १७० प्रकरणे निकाली

**पुणे । प्रतिनिधी**

न्याय हा केवळ न्यायालयाच्या चार भिंतींमध्ये मर्यादित न राहता, तो थेट नागरिकांच्या दारी पोहोचविणे, ही काळाची गरज ओळखून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या वतीने न्याय आपल्या दारी या नावीन्यपूर्ण उपक्रमांतर्गत फिरती लोकअदालतीसाठी विशेष मोबाइल व्हॅन सुरू करण्यात आली आहे. याद्वारे जिल्ह्यातील १७० प्रकरणांचा निकाल लावण्यात आला असून, एकूण १ कोटी ५४ लाख ७७ हजार ८२ रुपयांची सेटलमेंट करण्यात आली.




प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या व्हॅनने १२ जूनपासून पुणे शहर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र आणि कॅन्टोन्मेंट परिसरात कार्य सुरू केले. त्यानंतर २३ जून पासून पुणे जिल्ह्यातील सर्व १३ तालुक्यांमध्ये प्रवास केला. या प्रत्येक ठिकाणी स्थानिक न्यायालयाचे न्यायाधीश व कर्मचारी यांनीही मोबाइल लोकअदालतीच्या बेंचमध्ये सहभाग घेतला. जेणेकरून न्याय कार्य अधिक प्रभावी, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने पार पडले.

या उपक्रमात एकूण १७० प्रकरणे निकाली काढण्यात आली, ज्यात व दिवाणी व फौजदारी स्वरूपाची १३० प्रकरणे सोडविण्यात आली आणि त्यातून एकूण १,४९,४१,३३२ रुपयांची रक्कम सेटल करण्यात आली. ३६ पूर्ववादाची (प्री-लिटिगेशन) प्रकरणे निकाली काढून ५,३५,७५० इतकी रक्कम सेटल करण्यात आली. सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश. ए. के. पटणी यांच्या मार्गदर्शनाखाली, विधी स्वयंसेवक प्रमोद बानसोडे यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत कायदेशीर समज वाढवण्याचे काम केले, तर चालक व विधी स्वयंसेवक दत्तात्रय बारभुजे यांनी संपूर्ण जिल्ह्यात ही व्हॅन वेळेत पोहोचवण्यासाठी मेहनत घेतली.

## बिबट हा शत्रू नाही, जंगलाचा अविभाज्य घटक आहे; शिरूर तालुक्यातील बिबट प्रवण भागात विद्यार्थ्यांची जनजागृती

**शिरूर । प्रतिनिधी**

बिबट हा शत्रू नाही, जंगलाचा अविभाज्य घटक आहे या संदेशासह शिरूर वनविभागाने बिबट प्रवण भागातील टाकळीहाजी, पिंपरखेड, चांडोह, जांबुत येथे विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित केले होता. माणिकडोह बिबट निवारा केंद्राचे प्रोजेक्ट मॅनेजर महेंद्र ढोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमात तेथील मुलांना, पालकांना बिबट्याच्या जीवनशैली, स्वभाव, सवयी तसेच मानव-बिबट संघर्ष कमी करण्यासाठी घ्यावयाच्या खबरदारीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.




उपवनसंरक्षक, जुन्नर प्रशांत खाडे,सहाय्यक वनसंरक्षक, जुन्नर स्मिता राजहंस,वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरूर निळकंठ गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेतलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मिळालेली माहिती घरी व परिसरातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन करण्यात आले, जेणेकरून संघर्षाऐवजी सहजीवनाचा मार्ग खुला होईल.

- गटाने चालणे व लहान मुलांना एकटे न सोडणे.

- घराभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवणे, ऊसाची शेती टाळणे. - पाळीव जनावरे बंदिस्त गोठ्यात बांधणे. - रात्री टॉर्च, काठी व मोबाईलवर गाणी लावून बाहेर जाणे. - शाळेत शक्यतो समूहाने जाणे. - उघड्यावर झोपू नये.

दरम्यान, बिबट्याचा पाठलाग न करणे आणि दिसल्यास त्वरित वनविभागाला कळवणे या खबरदारीच्या महत्त्वाच्या सूचना बापूसाहेब गावडे विद्यालय टाकळी हाजी येथील विद्यार्थ्यांना व पालकांना देण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी शमहेंद्र ढोरे यांच्यासोबत त्यांची टीम, वनपाल पिंपरखेड नितिन म्हात्रे, वनरक्षक, लहू केसकर, महेंद्र दाते आणि बेस कॅम्प पिंपरखेडचे रेस्क्यू मेंबर्स उपस्थित होते.शरदवाडी, जांबुत, चांडोह येथे घराघरामध्ये तसेच मेंढपाळ वाडा तसेच चांडोह येथील अखंड हरिनाम सप्ताह येथेही जनजागृती केली आहे. या जनजागृतीद्वारे शिरूर तालुक्यातील बेट भागामध्ये मानव-बिबट संघर्ष कमी होऊन सहजीवनाची वाटचाल वेगाने होईल, असा आशावाद व्यक्त केला जात आहे.

## वेल काढण्याचे काम जीवावर बेतले; वीज प्रवाह बंद न केल्याने मजुराचा मृत्यू



**पुणे । प्रतिनिधी**

खांबावर आलेली झाडाची वेल काढण्याचे काम करणाऱ्या मजुराचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला आहे. ही घटना सिंहगड रस्ता परिसरातील वडगाव बुद्रुक भागात घडली.मेहबूब कासीम पठाण ( ४१, रा. दांगट पाटीलनगर, शिवणे, एनडीए रस्ता) असे मृत्यूमुखी पडलेल्या मजुराचे नाव आहे. या प्रकरणी मेहबूब यांचा भाऊ गुड्डू पठाण (वय ४५) याने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,विजेचे काम करणारे तांत्रिक कामगारअजय चौधरी यांनी मेहबूब याला महावितरणच्या खांबावर आलेली झाडाची वेल काढून टाकण्याचे काम सांगितले होते. हे काम करताना खांबावरील विद्युत प्रवाह बंद केला का ? याची शहानिशा करण्यात आली नाही. खांबावर चढून झाडाची वेल काढण्याचे काम करताना विजेचा धक्का बसल्याने मेहबूब यांचा मृत्यू झाला. पोलीस उपनिरीक्षक अमोल मालुसरे तपास करत आहेत.

## अजित पवारांचा पुण्यात दमदार जलवा; सयाजी शिंदेंसाठी गायलं गाणं, पालकमंत्रिपदावर मिश्कील टोला!

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि अभिनेते सयाजी शिंदे यांचा ६६ वा वाढदिवस पिंपरी-चिंचवडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत थाटात साजरा झाला. या सोहळ्यात अजित पवारांनी आपल्या खास शैलीत तुफान फटकेबाजी करत उपस्थितांची मने जिंकली. सकाळपासून सुरू झालेला त्यांचा पुणे दौरा संध्याकाळीही गाजला, कारण त्यांनी सयाजी शिंदे यांच्यासाठी ‘पिंजरा’ चित्रपटातील ‘गडी अंगाने उभानी आडवा, त्याच्या रुपात गावरान गोडवा’ हे गाणं गायलं आणि सभागृहात हशा पिकवला.




सयाजी शिंदे यांच्या वृक्षारोपण कार्याचं कौतुक करताना अजित पवार म्हणाले, आमचा संकल्प आहे दरवर्षी २५ कोटी झाडं लावण्याचा आणि सत्ताकाळात १०० कोटी झाडं लावून जतन करण्याचा. यामुळे पुढील २० वर्षांत निसर्ग संवर्धनात यश मिळेल. सयाजी शिंदे यांच्या रांगड्या व्यक्तिमत्त्वावरही त्यांनी भाष्य केलं. सयाजी आणि माझ्यात साधर्म्य आहे. स्पष्टवक्तेपणा आणि अस्सलपणा आम्हाला जोडतो, असं म्हणत त्यांनी सयाजींची प्रशंसा केली.

सोहळ्यात सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी नदीकाठच्या आणि दुर्गा देवी टेकडीवरील वृक्षतोडीबाबत प्रश्न उपस्थित केला. यावर अजित पवारांनी मिश्कीलपणे उत्तर देत सभागृहात हास्याची लाट पसरवली. ते म्हणाले, कुठून मी पुण्याचा पालकमंत्री झालो, असं वाटायला लागलंय! जो तो उठतो आणि मला उपदेश देतो. सगळा मक्ता मीच घेतलाय, यांनी फक्त सल्ले द्यायचे!

पिंपरी ते चाकण दरम्यान बारा पदरी रस्ता आणि सहा लेनचा पूल तसेच मेट्रो प्रकल्पावरही अजित पवारांनी भर दिला. मी कामाचा माणूस आहे, अधिकाऱ्यांना कामाला लावलंय, असं सांगत त्यांनी आपल्या कार्यशैलीवर प्रकाश टाकला. सयाजी शिंदे यांच्या आईबद्दलच्या पत्रवाचनाने सभागृहात भावनिक क्षण निर्माण झाले, तर अजित पवारांच्या फटकेबाजीने आणि गाण्याने हा सोहळा अविस्मरणीय ठरला.

## ज्ञानदेवी नगरमध्ये पहाटे घरफोडी ; ॲपल आयफोनसह १.२३ लाखांची चोरी

**आळंदी । प्रतिनिधी**

आळंदीतील ज्ञानदेवी नगर परिसरात अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून १ लाख २३ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी आळंदी पोलिसांनी सचिन भीमराव बागल (वय २४, रा. टाकळगाव, ता. वसमत, जि. हिंगोली) याला अटक केली आहे.ही घटना ७ ऑगस्ट रोजी सकाळी ५:३० ते ७:०० वाजण्याच्या दरम्यान ४ नंबर शाळेजवळ, ज्ञानदेवी नगर, आळंदी येथे घडली. फिर्यादी अमरसिंह रामभाऊ शेळके (वय २५, रा. ज्ञानदेवी नगर, मूळ रा. वालवड, ता. भूम) यांच्या घराचे कुलूप अज्ञात चोरट्याने तोडले.

घरात प्रवेश करून चोरट्याने ८९ हजार रुपये किमतीचा ॲपल कंपनीचा आयफोन, १८ हजार रुपये किमतीचा इन्फिनिक्स हॉट ११एस फोन आणि १६ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण १ लाख २३ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरला. घटनेची माहिती मिळताच आळंदी पोलिसांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान सचिन भिमराव बागल याला संशयित म्हणून ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक दुधमल करीत आहेत.

## यंदाचा दिशा परिवार सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार ‘दादाची शाळा’ भरवणाऱ्या अभिजित पोखरणीकरांना

**पुणे । प्रतिनिधी**

दिशा परिवारतर्फे दरवर्षी एका प्रेरणादायी सामाजिक कार्यकर्त्याला सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. या पुरस्कारामागची भूमिका ही केवळ कोणाला पुरस्कार देतो आणि त्याचा उदोउदो करणे एवढ्यावर सीमित नसून, समाजात खराखुरा बदल घडवून आणणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेणे आणि त्यांना समाजासमोर आणणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्यासाठी झटणाऱ्या व्यक्तींच्या कार्यातून इतरांनाही प्रेरणा मिळावी, अशी आमची भावना आहे. म्हणूनच दिशा परिवार या पुरस्काराद्वारे अशी कार्यकर्ती व्यक्तिमत्वं समाजासमोर आणत आहे, ज्यांनी निस्वार्थपणे आणि सातत्याने समाजहितासाठी कार्य केले आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह व २५,०००/- रोख रक्कम असे आहे.

२०२५ सालचा दिशा परिवार सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार हा अभिजित पोखरणीकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून कष्टकरी, वंचित व रस्त्यावर वस्तू विकून उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबातील मुलांना मुख्य प्रवाहात आणण्याचे अतुलनीय कार्य सुरू केले आहे. दरम्यान, यंदाचा हा सन्मान प्रदान सोहळा २४ ऑगस्ट २०२५ रोजी, दुपारी, एस. एम. जोशी सभागृह, नवी पेठ, पुणे येथे पार पडणार आहे.




अभिजित पोखरणीकर आणि ‘दादाची शाळा’समाजात शिक्षणापासून वंचित राहिलेली अनेक मुले आजही रस्त्यांवर किंवा पुलाखाली दिवस काढतात. त्यांच्या हातात खेळणी किंवा पुस्तके नसून, विक्रीसाठी असलेल्या वस्तू असतात. पण याच झगडणाऱ्या आयुष्यात शिक्षणाची उमेद निर्माण करणारा एक युवक म्हणजे अभिजित पोखरणीकर. पुण्यातील अभिजित यांनी ‘दादाची शाळा’ या उपक्रमाची सुरुवात केली. हा उपक्रम म्हणजे केवळ शिक्षणप्रदान नव्हे, तर मुलांमध्ये आत्मविश्वास, सामाजिक जाणिवा आणि स्वप्न पाहण्याची हिंमत जागवण्याचा प्रयत्न आहे. रस्त्यांवर आणि पुलाखाली संध्याकाळी भरवली जाणारी ही शाळा, या मुलांसाठी शिक्षणाचे दार उघडणारी पहिली पायरी ठरली आहे.

अभिजितने सुरुवातीला काही स्वयंसेवकांच्या मदतीने शिक्षण देण्यास सुरुवात केली. हळूहळू ही चळवळ मोठी होत गेली. ‘एज्युकेअर ट्रस्ट’च्या माध्यमातून हा उपक्रम अधिक शिस्तबद्ध आणि व्यापक झाला. पुण्यातील विविध भागांमध्ये-मार्केट यार्ड, कात्रज, झेड ब्रिज, हडपसर- अशा अनेक ठिकाणी आजही दादाची शाळा भरते. आज ‘दादाची शाळा’तून १७०० हून अधिक मुले शिकली आहेत, आणि जवळपास ७५० मुले नियमितपणे शिक्षण घेत आहेत. केवळ पुस्तकी शिक्षणच नव्हे, तर या शाळांमध्ये मुलांना चित्रकला, खेळ, तंत्रज्ञान, व्यक्तिमत्त्व विकास यांचीही ओळख करून दिली जाते.

अभिजित यांचा हा उपक्रम म्हणजे एक खऱ्या अर्थाने देशसेवा करणारा प्रयत्न आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजघटकांना मुख्य प्रवाहात आणण्याची ही चळवळ प्रेरणादायी आहे. समाजात सकारात्मक बदल घडवण्याची जाणीव आणि कृतीशीलता यांचा सुंदर मिलाफ म्हणजेच - ‘दादाची शाळा’

## पुण्यात बांधकाम प्रकल्पांचे नामफलक आता मराठीतच ; महापालिका आयुक्तांचा आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

मान्यता प्राप्त निवासी आणि व्यावसायिक बांधकाम प्रकल्पांचे नामफलक मराठीत लिहिण्याचे आदेश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी काढले आहेत. याबाबत सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कनोजिया यांनी महापालिका आयुक्तांकडे पत्राद्वारे मागणी केली होती.केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमानुसार प्राप्त रेखांकन आणि बांधकाम प्रस्तावांना पुणे महापालिकेमार्फत परवानगी देण्यात येते.त्यानंतर विकसकामार्फत मान्य बांधकाम परवानगी नुसार प्रत्यक्ष जागेवर काम करण्यात येते. विकसकांमार्फत होत असलेल्या विविध निवासी आणि अनिवासी इमारत विकास प्रकल्पांचे नामफलक मराठी भाषेत ठळक अक्षरात दर्शनी भागात दर्शवणे या कार्यालयीन परिपत्रकाच्या दिनांकापासून अनिवार्य करण्यात येत आहे, असे आयुक्तांनी दिलेल्या आदेशात म्हटले आहे.

